# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

**<u>दिनांक १४-१२-२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.</u>**

सोमवार दिनांक १४ डिसेंबर २०१५ रोजी (का.प.क्र.११) मा.महापौर श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११-०० वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.सुनिल केंद्रेकर,**आयएएस** नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स. श्री. प्रमोद प्रल्हाद राठोड
२. स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
३. स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
४. स.स. श्री.खान जहाँगीर मुलानी
५. स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
६. स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
७. स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
८. स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
९. स.स. सौ.रोजतकर पुष्पा उत्तमराव
१०. स.स. श्री.विजय साईनाथ औताडे
११. स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१२. स.स. सौ.स्वाती किशोर नागरे
१३. स.स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१४. स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान
१५. स.स. श्री.जाधव ज्ञानोबा पांडूरंग
१६. स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१७. स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी
१८. स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
१९. स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
२०. स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद
२१. स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
२२. स.स. श्री.सय्यद मतीन रशीद
२३. स.स. श्रीमती शकीला बेगम फैयाजोद्दीन
२४. स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
२५. स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
२६. स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२७. स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
२८. स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२९. स.स. श्रीमती खरात सिमा गणपत

३०. स.स. सौ.शोभा नारायणराव वळसे
३१. स.स. श्री.चित्ते नितीन रमन
३२. स.स. सौ.ज्योती सुभाष पिंजरकर
३३. स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र
३४. स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी
३५. स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले
३६. स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
३७. स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
३८. स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
३९. स.स. श्री.शिंदे राजु रामराव
४०. स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम
४१. स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
४२. स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम
४३. स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ
४४. स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
४५. स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी
४६. स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी
४७. स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
४८. स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया
४९. स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज
५०. स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
५१. स.स. श्री.एडके विकास प्रकाश
५२. स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
५३. स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव
५४. स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम
५५. स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी
५६. स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास
५७. स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
५८. स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास
५९. स.स. श्री.शेख जफर अखतर
६०. स.स. श्री.जहागीरदार मोहम्मद अयुब गुलाम जिलानी
६१. स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
६२. स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब
६३. स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत
६४. स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश
६५. स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान
६६. स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत
६७. स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी
६८. स.स. श्री.बारवाल गजानन रामकिसन
६९. स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण

७०. स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर
७१. स.स. श्रीमती बनकर विजया संजय
७२. स.स. श्री.साळवी नितीन दशरथ
७३. स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल
७४. स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र
७५. स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
७६. स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास
७७. स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
७८. स.स. श्रीमती सत्यभामा दामु अण्णा शिंदे
७९. स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव
८०. स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र
८१. स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
८२. स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव
८३. स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल
८४. स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
८५. स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब
८६. स.स. श्रीमती मिना रामदास गायके
८७. स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव
८८. स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
८९. स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
९०. स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
९१. स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
९२. स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
९३. स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
९४. स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ
९५. स.स. श्री.विकास रतनलाल जैन
९६. स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
९७. स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे
९८. स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
९९. स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन
१००. स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे
१०१. स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे
१०२. स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी
१०३. स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण

नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम

श्री.राजेंद्र जंजाळ :शेतकऱ्यांचे नेते व ज्यांनी शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढा दिला असे मा.शरदभाऊ जोशी यांचे दु:खद निधन झाले. त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :माजी स.सदस्या श्री.रजनी जोशी यांचे पती रमेश जोशी यांचे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

या प्रस्तावास श्री.नंदकुमार घोडेले, श्री.दिलीप थोरात, श्री.कैलास गायकवाड, श्री.गजानन बारवाल, श्री.जहागीर खान, श्री.भाऊसाहेब जगताप यांनी अनुमोदन दिले.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.
या वेळी स्व.शरद जोशी तसेच स्व.रमेश जोशी यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

मा.महापौर :अगोदर विषय घेऊ नंतर चर्चेसाठी वेळ दिला जाईल.

**विषय क्रमांक २४५:-** **(घनकचरा व्यवस्थापन कक्ष)**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, घनकचरा विभागामार्फत स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची प्रभावीपणे अंमलबजावणी होणेसाठी कचरा संकलन व वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी वाहने ही जुन्या पध्दतीची तसेच निरुपयोगी झालेली आहेत. तसेच भविष्यात कचरा संकलन व वाहतुकीसाठी आवश्यक अद्यावत यंत्रणेसह सुसज्ज व लोकोपयोगी असणे आवश्यक आहे. त्यादृष्टिकोनातून कचरा संकलन व वाहतुकीसाठी Tata ACE with Close Bin's या गाड्या खरेदी करणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे प्रत्येक निवडणूक वॉर्डासाठी एक याप्रमाणे ११५ आणि १० राखीव याप्रमाणे एकुण १२५ गाड्या आणि तीन Compactor खरेदी करणे गरजेचे आहे.

शासन निर्णयानुसार १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यासाठी मोठ्या प्रमाणात निधी वितरीत झाला. हा निधी “ड” वर्ग महानगरपालिका आणि नगर परिषद यांना देण्यात आलेला आहे. त्यात “क” वर्ग महानगरपालिकेचा उल्लेख नाही. दिनांक ०१ सप्टेंबर २०१४ च्या शासन निर्णयानुसार औरंगाबाद महानगरपालिका “ड” वर्गातून “क” वर्गामध्ये समावेश झाल्यामुळे शासनाकडुन १४ व्या वित्त आयोगात निधी प्राप्त होऊ शकला नाही. तथापि, औरंगाबाद महानगरपालिकेचा लोकसंख्येच्या आधारावर एक वर्षापुर्वी “क” वर्गात समावेशझालेला असला तरीही स्वत:चे उत्पन्नाचे स्त्रोत त्याप्रमाणात वाढलेले नाहीत. त्यामुळे सप्टेंबर २०१४ ला महानगरपालिकेची जी आर्थिक परिस्थीती होती त्यात अद्याप पावेतो बदल झालेला नाही. ही बाब शासनाचे निदर्शनास आणून घनकचरा व्यवस्थापनाचे कचरा संकलन आणि वाहतुकीचे अद्यावतीकरण करणेसाठी विशेष बाब म्हणुन १४ व्या वित्त आयोगामधून औरंगाबाद महानगरपालिकेला निधीची मागणी करणे योग्य वाटते. अथवा स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) करीता वाहने खरेदी करणेसाठी निधी मिळणेबाबत शासनास विनंती करणे योग्य.

करीता उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

श्री.नंदकुमार घोडेले :या प्रस्तावाविषयी माहिती घेण्यात यावी.

अति.आयुक्त :घन कचरा व्यवस्थापना विषयी अभ्यास केला डीपीआर तयार केला हे करत असतांनाच बडोदा येथे व्हीजीट केली व जे वाहने मनपाकडे आहे. ती वाहने घनकचरा व्यवस्थापनासाठी योग्य वाटत नाही. हायड्रोलिक लेव्हलची वाहने असावी. प्रत्येक वार्डासाठी एक गाडी जे

व्यक्तीकडे हॅडलिंग होते. तेच मॅकेनिकली व्हावे असे आहे. त्यानुसार हा प्रस्ताव दिला. ११३ वार्ड अधिक १० गाडया असे १२५ गाडयाचे हे प्रपोजल प्रत्येक दोन वार्ड मिळून २ असे ३ कॉम्पॅक्टर ठेवले ओला सुका कचरा वेगळा ठेवून सुका कचऱ्यासाठी कलेक्शन सेंटर ठेवून कार्यवाही करता येईल. प्रस्ताव मोठा असला तरी गरज आहे. यासाठी निधी कोठून आणावा असा प्रश्न होता ऑगस्ट २०१५ मध्ये १४ व्या वित्त आयोगाचा जी आर निघाला. पुढील ५ वर्षासाठी १२ हजार कोटीची तरतूद आहे. १२,१३, वा वित्त आयोगाचा निधी मिळाला अटी होत्याकी घनकचराऱ्यावर खर्च करावा परंतु तो तेवढा यावर खर्च झाला नाही.१४ व्या वित्त आयोगाचे १०० टक्के अनुदान मिळणार "ड" वर्ग महापालिकेसाठी आहे. मागिल वर्षी औरंगाबाद महापालिकेचा क वर्ग मध्ये समावेश केलेला आहे पाठपुरावा करून "ड" वर्गाचे फंडींग मिळाले तर ही वाहने घेता येतील.भारत स्वच्छता अभियान अंतर्गत पैसे मिळू शकतात डीपीआर तयार करण्यासाठी वेळ लागेल. काम लवकर होईल.

मा.महापौर :टाटा कंपनीचा स्पेसीफिक उल्लेख केला असे करता येते का?

मा.आयुक्त :स्पेशल अशा कंपनीचा उल्लेख करता येणार नाही काय पाहिजे सादर करावे लागेल ज्या कंपनी हे कम्प्लीट करतील त्यांचेसाठी टेंडर असेल.

श्री.नंदकुमार घोडेले :ठराविक कंपनीच्या नावानिशी प्रस्ताव ठेवणे चुकीचे आहे.अनेक कंपनीकडे प्रॉडक्ट आहे ज्यांचेकडे असेल ते टेंडर भरतील. यातील टाटा कपंनीचे नाव वगळावे.

श्री.विकास जैन :महापालिकेचा "क" वर्गात समावेश झालेला आहे. शासनाने मान्य केले नाही तर महापालिका ही कार्यवाही करणार काय? सध्या अशी परिस्थिती की बीन्स नाही कचरा कुठे टाकायचा प्रश्न पडतो दुस-या वार्डात टाकू देत नाही. वार्ड अधिकारी लक्ष देत नाही. बैठक घेत नाही.शासनाने निधी मान्य केला नाही तर महापालिका बजेटमध्ये यासाठी तरतूद करणार आहे का ?

श्री.नंदकुमार घोडेले :स्वच्छ भारत अभियान राबविले जात आहे.केंद्र शासनाकडून अनेक प्रोजेक्टला निधी येतो आहे. जर शासनाचा निधी आला नाही तर केंद्र शासनाच्या माध्यमातून डीपीआर तयार करून हा निधी मिळू शकेल.

श्रीमती किर्ती शिंदे :२०-८-२०१५ च्या सभेत ६० हेड्रोलिक रिक्षाची मागणी केली शासनाकडे पाठविले मंजूर सुध्दा झाले. सध्या ५८ रिक्षा उपलब्ध आहे. ११३ वार्ड आहे प्रत्येक वार्डासाठी १ रिक्षा अशा ११३ व एक्ट्रा मिळून १२० रिक्षाची गरज आहे ५८ रिक्षा उपलब्ध आहे.असे असतांना ३ Compactor खरेदी करण्याची मागणी केली उपलब्ध असलेल्या रिक्षा व भविष्यात लागणा-या रिक्षाची गरज लक्षात घेता ७ हुकलोडर ४२ बीन्स गाडया आहे. दोन वार्ड मिळून एक हुकलोडर व १८ बीन्स गाडया खरेदी केल्यास ६०-७० टक्के कच-याची समस्या सुटेल. ५ जेसीबी असून २ खराब आहे ते दुरूस्ती करावे. चार ट्रॅक्टर लोडर घ्यावे. वार्ड अधिकारी स्व.नि. यांना विचारुन कार्यवाही करावी.

श्री.कैलास गायकवाड :२००० ला एमएसडब्ल्यू रूल्सनुसार या प्रस्तावाची अंमलबजावणी होणार का? तसे नसेल तर नवीन शासनाचा काही निर्णय आलेला आहे का? व प्रस्तावित केल्यानुसार वार्डात एक गाडी व एक्स्ट्रा १० गाडया घेणार परंतु जुन्या गाडया विक्री करणार किंवा कसे? माहिती दयावी.

श्री.दिलीप थोरात :मंजूर करावे शासनाकडे पाठवावे.राज्य व केंद्र शासनाचे इतरही प्रस्ताव असतील ते तयार करून यास मंजूरी आणण्यासाठी स्वतंत्र अधिकारी नेमावे. यासाठी सर्व लोकप्रतिनिधी व स.पदाधिकारी यांनी शासनाची भेट घेऊन हा निधी कसा मिळेल यासाठी प्रयत्न करावे. इतर शहरास हजारो कोटी शासनाच्या माध्यमातून निधी मिळाला आहे.

श्री.कैलास गायकवाड :यासाठी किती खर्च लागणार नमूद केले नाही.

कु.यशश्री बाखरिया :या ऐवजी इकोफ्रेंडली गाडया ज्या बॅटरीवर चालतात त्या घेतल्यास योग्य होईल स्मार्ट सिटी होत आहे यामुळे प्रदुषण होणार नाही खर्च कमी लागेल या गाडयासाठी प्र.कि.७० पैसे मेन्टनन्स सहीत खर्च येतो.१ ते दीड टनापर्यत कॅपीसीटी असते.१.७० प्राईज आहे.केंद्र शासनाकडून सबसिटी मिळाली तर १ लक्ष पर्यत एका गाडीसाठी खर्च येईल.कमी खर्च आल्यास या निधीतून शिल्लक राहिलेला पैसा इतर कामासाठी खर्च करता येईल.

श्री.भाऊसाहेब जगताप :शासनाने मंजुरी दिली नाही तर यासाठी मनपा तरतुद करणार काय? किती वार्डात रिक्षा मजूर नाही.राजनगर वार्ड ९० मध्ये सफाई कामगार नाही.मुकूंदवाडी जालना रोडवर हुकलोडर होते ते आता एअरपोर्ट भिंतीलगत लावले.एकच हुकलोडर असल्यामूळे कचरा गाडया तेथे थांबतात आणखी एक हुकलोडर उपलब्ध करून दयावे.

श्री.जहागींर खान :स्मार्ट सिटी कडे जात आहोत पोलीस मेस पासूनचा १०० फुट रस्त्यावर कचरा पडलेला दिसतो ११३ गाडया घेण्याची गरज आहे का प्रत्येक वार्डास एक गाडी असावी.ड्रेनेज लाईन मध्ये १०० कोटी कमी होऊ शकतात तर यातही खर्च कमी होऊ शकतो.

श्रीमती शरवत बेगम :स्वच्छ भारत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत शासन निधी देत आहे.हा निधी “ड” वर्ग महापालिकेसाठी आहे सप्टेंबर २०१४ शासन अध्यादेश नुसार “ड” मधून क वर्गात महापालिकेचा समावेश झालेला आहे. असे असतांना उत्पन्न वाढलेले नाही. तर “क” वर्गात टाकण्याचे कारण काय व क वर्गात महापालिका आलेली असतांना या योजनेचा लाभ मिळू शकेल का? गाडया बरोबरच वाहनचालक व सफाई मजूर किती लागणार आहे? वार्डाचे क्षेत्र वाढले आहे. रॅमकीकडे असेलेले १८० व खाजगी कामगार कमी केल्याने सफाई मजूर कमी आहे. शासन अनुदान देत असेल तर आनंदाची बाब असून चालक व मजूरांची संख्या कशी वाढेल या बाबतही कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :१४ वित्त आयोग हा ड वर्ग महापालिकेसाठी ही महापालिका “क” मध्ये आलेली आहे हा प्रस्ताव नामंजूर केला तर ही तरतूद कशातून करणार आहे बचतगटाचे कर्मचारी चार दिवसापासून बंद आहे.अपु-या कर्मचाऱ्यामूळे शहर स्वच्छ सुंदर होईल का?

मा.उपमहापौर :मा.आमदार श्री.अतुलजी सावे यांनी मा.मुख्यमंत्री यांचेशी या संदर्भात चर्चा केली व तसा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश होते.हा निधी मिळणार प्रस्ताव पाठवावा.शहर कचरा मुक्त करण्यासाठी प्रशासन वाटचाल करीत आहे. यासाठी बैठका झाल्या जो घटनाक्रम आहे त्याची सविस्तर माहिती घनकचरा प्रमुख देतिल.सध्य स्थिती काय व कचरा मुक्त करण्यासाठी काय नियोजन असेल ते सांगावे.

श्री.शेख अब्दुल ताहेर :दररोज कचरा उचलला पाहिजे तशा सुचना देण्यात याव्यात. सुपर वायझर यांनी प्रत्येक वार्डात आठवडयातून पाहणी केली पाहिजे. यावर नियंत्रण असल्याशिवाय परीस्थिती बदलणार नाही. केंद्रात व राज्यात व येथे एकाच पक्षाची सत्ता आहे ग्रॅण्ड साठी सर्वांनी प्रयत्न करावे. ॲटोमॅटिक कचरा उचलून दुस-या गाडीत पडतो. अशी मशीनरी आहे ती घेण्यात यावी.

श्रीमती मनीषा मुंढे :माझ्या वार्डात चार सफाई मजूर दयावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :दुरूस्ती करून शासनाकडे प्रस्ताव पाठवावा यापुर्वी गाडयाच्या बाबतीत टेंडर करण्याचे मंजूर केले भाडयाने गाडया देणार होते.त्या उपलब्ध करून दयाव्यात.

मा.आयुक्त :जेवढया गाडया लावल्या तेवढया चालू आहेत का? ज्या मशीनरी पडलेल्या आहे त्या गाडया व कर्मचारी कामच करीत नाही त्यांचेकडून काम करून घेणे हे पहिले प्राधान्य असेल.कचरा वेचणारे कर्मचारी यांची बैठक घेतली. या लोकांना वाळूज मॉडेल दाखवले ही दिर्घ काळाने होणारी प्रोसेस आहे यात कचरा निर्माण करणारे यांचेशी चर्चा करावी लागेल समजावून सांगावे लागेल. प्रत्येकाने मेनकापड काढायचे वापरायचे व रस्त्यावर फेकायचे ते होऊ नये यासाठी खंबीरपणे काम करावे लागेल शहरातील सर्व कचरा नारेगावात जातो मा.उच्च न्यायालयाचे निर्देश असतांना सुध्दा महापालिका हतबल झाली की तेथे कचरा नेल्याशिवाय पर्याय नाही.नारेगावातून कचरा नेऊ नका अशी छोटीशी मागणी तेथील नागरीकाची आहे. त्यासाठी इतर विभागाशी बोलावे लागते. सिडको वाळूज मध्ये जे केले. खात्री होती हे सक्सेस होईल. तेथील लोकांना प्रयोग करण्यास सहमती दिली सुरक्षा रक्षक, एक अधिकारी व इतर कर्मचारी यांनी चित्र बदलून दाखवले प्रत्येकाला वाटते लगेच कार्यवाही परंतु आपल्याला सिस्टेमॅटीकली जावे लागेल यास वेळ लागणार आहे. प्रत्यक्ष वाळूज येथे नेऊन कर्मचा-यांना दाखविले. खात्री झाली तेथील परीस्थितीचा कन्सेप्ट काय आहे? प्लास्टीक विकणा-या लोकांची बैठक घेतली. समजावून सांगण्याचा प्रयत्न केला त्यांनी आश्वासन दिले की, ३१ डिसेंबर पर्यत जो स्टॉक आहे तो परत पाठविणार. त्यानंतर आढळल्यास पोलीस गुन्हे दाखल केले जातील स्पष्ट सांगितले. प्लास्टीक निर्मिती करणारे कंपनींची यादी घेतली. या संदर्भात जिल्हाधिकारी यांना पत्र देऊन अनधिकृत प्लास्टीकची निर्मिती करतात. त्यांचेवर गुन्हे दाखल करावे. आता प्रत्येक नागरीकाने कपडयाची पिशवी घेऊन वस्तू त्यात घ्याव्यात.सर्वांचा

बेजबाबदार पणा यात येतो.कचरा जमा करणारी मलेरिया फवारणी करणारी व्यक्तीही फार महत्वाची गाडयाचे रूट त्यांचेकडून ठरवून घेऊ ते ठरल्यानंतर कुठल्या वार्डातून कूठल्या मार्गे कोणत्या नंबरची गाडी जाते हे वृत्तपत्रात जाहीर करावे लागेल. ही झाली कचरा गोळा करण्याची व्यवस्था. ही व्यवस्था फार काळ चालणार नाही यासाठी कचरा डेपोची व्यवस्था लागणार. कचरा डेपोची परीस्थिती सर्वांना माहित आहे. सिडको मध्ये ओला सुका-कचरा सोर्समध्ये वेगळा करू शकलो तर भारतातील हे एकमेव शहर असेल ज्याचे हे उदा. असेल, काम सोपे नाही, येथे ६-१२ महिने सतत काम करावे लागेल. वाळूज एमआयडीसी एरिया लहान आहे. तरी सुध्दा ८ महिने लागले आज तेथे सुका-ओला कचरा वेगळा होतो. तो जागेवर कम्पोस्टींग होतो. यात महिलांनी पुढाकार घेतला.आता इमारत बांधकाम देतांना कचरा कम्पोस्टींग करणे सक्तीचे असावे. तसे आदेशीत केले. ओला कचरा जागेवर कम्पोस्टींग केल्यास व सुका कचरा खराब होत नाही आठवडयातून एक वेळेस उचलू शकतो यातून महापालिकेचा वाहतूकीचा खर्च वाचेल. सुका कचरा विकणारी किंवा विकत घेणाऱ्यांची बैठक घेतली. ते कचरा घेऊन जाणार, विकुन टाकणार. त्या पैशाची महापालिकेस अपेक्षा नाही. फक्त ते कचरा जागेवर राहू देणार नाही. ही वाटचाल सुरू करावी लागेल. स.सदस्य श्री.दांडगे व मा.उपमहापौर यांचे वार्डात या पध्दतीने सुरूवात झाली. सर्वांच्या वार्डात या पध्दतीने काम केले तर कचरा दिसणार नाही. सर्वांना मिळून काम करावे लागेल. तरच शहर स्वच्छ होईल. नुसत्या गाडया घेऊन त्यावर डिझेल, कर्मचारी लागणार. जो प्रश्न सोप्या पध्दतीने सुटतो, सोडला पाहिजे कचरा डेपो निश्चित करणे अवघड आहे. कच-याच्या संदर्भात बैठका घेतो सर्वांनी हजर राहायला पाहिजे भविष्यात कर्मचारी, वाहने वापरात येईना हा आक्षेप येऊ शकतो. या बाबत नियोजन चालू आहे. आता पब्लीककडे जातो आहे. दररोज कच-याची गाडी आली पाहिजे. असे म्हटले परंतु कचरा किती निर्माण करतो? करायला पाहिजे? हे लक्षात घेणे आवश्यक आहे. कचरा निर्माण करण्यावर कन्ट्रोल आणावे लागेल. प्लास्टीक पिशव्या अनेक लोक वापरतात. कापडी पिशव्या वापरल्या पाहिजे. यासाठी लोकांनी मनस्थिती बदलावी लागेल. यासाठी लोकप्रतिनिधी यांनी पुढाकार घ्यावा. बचतगटांचे कर्मचारी बंद केले तपासणी केली जाईल. कचरा गोळा करण्यासाठी कमीत कमी खर्च व्हावा. कचरा जमा करणारे महिलांची बैठक घेतो. त्यांना कचरा मिळत नाही. आपले म्हणणे कचरा उचलत नाही. हे जोडण्याचा प्रयत्न आपण करतो. अनेक भागात कचरा मिक्स करतो. दाट लोकवस्ती मध्ये कम्पोस्टींग खड्डे करण्यासाठी जागा मिळणार नाही. परंतु जेथे महापालिकेची ओपनस्पेस आहे अशा ठिकाणी महापालिकेच्या खर्चाने खड्डे करावे लागेल. साधा कचरा असेल तर कुचतो परंतु प्लास्टीक कुजत नाही. ते वापरण्यावर आपण पहिले बंद करावे. १२५ गाडया

घेऊन प्रश्न सुटेल असे वाटत असेल तर मी सम्मत नाही. कचरा जमा करून नारेगांवला पाठविणार का आता वाळूजला नवीन मॉडेल केले ते करावे लागणार नवी मुंबई मध्ये सुध्दा होत आहे. मॉडेल म्हणजे ग्रेट काम केले असे नाही. वाळूजला फुकट काम करून घेतले परंतु आता पैसे दयावे लागणार. त्यांना सांगितले की, महापालिकेच्या पैशातून एकही पैसा देणार नाही. कंपनीला विनंती केली की, तुम्हीच स्पॉन्सर करावे. जो काही खर्च येईल, कंपनी करेल खर्च कमी व्हावा हे सर्वांत अवघड. सर्वाचे सहकार्य आवश्यक आहे.

श्री.नंदकुमार घोडेले :मा.आयुक्तांची या प्रस्तावाविषयी काय भुमिका आहे.

मा.आयुक्त :जर शासनाच्या खर्चाने हे येते जेंव्हा भाडयावर ५०-७० रिक्षा खर्च करतो. भाडयाचे स्ट्रक्चर बघीतले, मला पटले नाही. र.रू २२००/- रिक्षा घेत असलो तर महागात आहे. हे येणार असेल तर महापालिकेने डावलण्याचा प्रश्न नाही घेतले पाहिजे. आणखी काही उपाययोजना करता येईल. कम्पोस्टींग चांगले करता आले तर उत्पन्नाचा भाग निर्माण होईल या प्रस्तावास माझे समर्थन आहे. गाडया घेऊन प्रश्न सुटणार नाही.

कु.यशश्री बाखरीया :बुलढाणा, नगर येथे पायलेट प्रोजेक्ट राबविले. तसा प्रोजेक्ट येथे राबविला तर वेगळी ओळख निर्माण होईल.

श्रीमती समिना शेख :कचरा संकलना संबधीत अधिकारी कर्मचारी यांची यादी जाहीर केली. नागरीकांना नावे माहित झाली. काय समस्या आहे? सदस्यांनाही विचारणा कराव्यात. माझ्या वार्डात ओपन जागेवर कचरा टाकला जात होता. तेथे साफसफाई करून नागरीकांसाठी बेंचेस केले. कचरा कुठे टाकला जातो. माहित नाही असे सांगतात.

श्री.गजानन बारवाल :म्युन्सीपल सॉलीड-वेस्ट २००० चे रूल प्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाचे काही निर्देश त्याची दखल घ्यावी विषय मंजूर करावा.

श्री.राजू शिंदे :साफसफाई करण्याकडे मा.आयुक्तांनी चांगले लक्ष दिले हे काम सतत चालू रहावे. मा.आयुक्तांचे याबद्दल अभिनंदन करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.आयुक्तांचे अभिनंदन करावे. स्वच्छतेची टिम माझ्या वार्डात येते. आम्ही सुचना दिल्याप्रमाणे काम करीत आहे. काही ठिकाणी डस्टबीन नाही. गोण्यामध्ये कचरा गोळा होतो. लोक कंपाऊंड मध्ये कचरा ठेवत आहे. ओला-सुका करण्यास वेळ लागेल. ही पध्दत कायम रहावी.

श्री.विकास जैन :माझ्या वार्डातही स्वच्छतेची टीम पाठवावी.

मा.उपमहापौर :स्वच्छतेवरील सर्व टिमचे अभिनंदन करावे.

कु.यशश्री बाखरीया :प्रत्येक वार्डात आवश्यक बीन्स नागरीकांना देण्यात याव्यात.

मा.आयुक्त :जे कचरा निर्माण करतात. त्यांची ती जबाबदारी आहे. बीन्सची आवश्यकता वाटायला नको.

श्री.नासेर सिद्दीकी :वार्ड २५ मध्ये पंचायत समितीच्या जागेत कचरा टाकला जातो. हप्त्यातून दोन वेळेस कचरा उचलतात. मोकाट कुत्रे तो कचरा पसरवितात. या विषयी वेळीच कार्यवाही व्हावी. सफाई कर्मचारी दयावेत.

मा.आयुक्त :या वार्डात स्वत: पाहणी करेल.

श्रीमती सुनिता आऊऴवार:ओला-सुका कचरा वेगळा करावा. रस्त्यावर कचरा येऊ नये. दुर्गंधी पसरते. डस्टबीन मध्ये तो गोळा करावा.

श्री.शेख जफर :गल्ल्या लहान असल्यामूळे काही ठिकाणी रिक्षा जात नाही. अर्ध्या गल्लीतून परत येते. काही लोक डस्टबीन बाहेर ठेवतात. कुत्रे तो कचरा पसरवितात. काही वयोवृध्द महिला सफाई साठी ते काम करीत नाही.

श्री.रावसाहेब आमले :वार्ड १४-१५ मध्ये साफसफाई होत नाही.

श्रीमती अर्चना निळकंठ :वार्डात आम्ही ओला सुका कचरा वेगळा करतो. माझ्या वार्डात एकच कर्मचारी असल्याने कचरा वेळीच उचलला जात नाही. आठवडयातून एक गल्ली साफ होते. यामूळे साथीचे रोग होतात. चाणक्यपुरीचा नाला साफसफाई करावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:माझ्या वार्ड साठी श्री.पाटील हे अधिकारी नियुक्त केले. त्यांना बैठकीसाठी बोलाविले परंतु ते आले नाही. ओपन प्लॉटवर कचरा टाकला जातो. संबधीतांना नोटीस पाठवावी. कचरा टाकण्याचे प्रमाण कमी होईल.

श्री.रामेश्वर भादवे :कायम स्वरूपी कर्मचारी यांचे जागेवर बदलीने र.रु.३०००/- पगारावर दुसरे खाजगी व्यक्ती काम करतात. असे निदर्शनास आले.

श्रीमती माधुरी देशमुख :प्लास्टीक असेल, कचरा असेल यासाठी हिमाचल प्रदेश मधील कुलूमनाली,शिमला येथील पॅटर्न राबविल्यास मुक्तता होऊ शकते. तेथे लहान मोठया दुकानात कापडी पिशवी दिली जाते. त्याप्रमाणे येथील दुकानदारावर ती सक्ती करावी. कचरा निर्मुलनासाठी म्हैसूर पॅटर्न राबवावा. वार्ड ८० मध्ये इमारती बांधतात व त्यातील शिल्लक मटेरियल बंगल्याच्या बाहेर टाकतात. त्यांचेवर कार्यवाही करावी. झाडे कटींग होतात. ते रस्त्यावर फेकतात. त्यासाठी सुध्दा पाबंध करावे.

श्री.रावसाहेब आमले :वार्ड १४-१५ हा मनपामध्ये असला तरी ग्रामपंचायत सारखे वाटते. ग्रामीण मधील कचरा या वार्डात लोक आणून टाकतात. बाजूलाच तीसगाव रावरसपूरा ग्रामपंचायत आहे. तेथील कचरा वार्डात टाकतात.

मा.आयुक्त :आपण मला कळवावे तारीख निश्चित करावी मी प्रत्यक्ष पाहिणी करेल.

श्री.जहागींर खान :कटकट गेटच्या बाहेरीत १०० फुटाचा रस्ता आहे. पोलीस कॉलनीजवळ १५ फुट रस्ता आहे. वार्ड २६ मध्ये ७-८ ओपनस्पेस आहे आहे. बाजूला मनपाच्या ओपनस्पेस आहे तेथे अतिक्रमण झाले. तेथे कचरा टाकू शकतो. नाल्यात कचरा टाकला जातो तो काढण्यात यावा. नागरीक आजारी पडत आहेत. बाबा कॉलनी येथे दोन डेंग्युचे रूग्ण आढळले.

श्रीमती.मिना गायके :वार्ड ९३ मध्ये शिवाजी महाराज पुतळा ते गोकूळ स्वीट पर्यतच्या रस्त्यावर मटनाची दुकाने आहेत. घाण कचरा पुतळयाच्या पाठीमागे टाकला जातो. मोकाट कुत्रे वाढले. तेथे पाहणी करून कार्यवाही करावी.

श्री.राहुल सोनवणे :माझ्या वार्डात चार कुंडया आहे. तरी कचरा रोडवर टाकला जातो आणखी कुंडया द्याव्यात. नाल्याच्या बाजूला भिंत आहे तेथे कचरा टाकतात तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयाच्या बाजूला नाला जातो. ड्रेनेजचा प्रॉब्लेम आहे. सोडवला नाही.

मा.आयुक्त :आपल्या वार्डात कुंडी दिली जाईल. परंतु ओला-सुका कचरा करण्यास नागरीकांना सांगावे. सिडकोकडून वीस कुंडया घेत आहोत.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:माझा वार्ड “ड” व “फ” मध्ये विभागला गेला वार्ड “ड” अधिकारी चागले काम करतात परंतु “फ” चे श्री. अभंग हे काम करीत नाही त्या भागात स्वच्छता होत नाही. सुचनांची अंमलबजावणी होत नाही.

श्रीमती विमल केंद्रे :कचरा संकलन केंद्रात कचरा अस्ताव्यस्त पडलेला असतो. एक-एक डस्टबीन देण्यात यावी. वार्डात सफाई कर्मचारी कमी आहे. एका दिवसात एक गल्ली तर आठ दिवसातून एका ठिकाणी साफसफाई होते.

मा.आयुक्त :डस्टबीन देणे तात्पुरता पर्याय आहे. जेथे ओला-सुका कचरा पडेल तेथे पोल रोऊन त्यास पडदा लावून तसे सेन्टर्स करण्याचे सांगितले. तेथील कच-या पासून नागरीकांना त्रास होणार नाही अशी व्यवस्था होत आहे. वाढीव कर्मचारी देण्याची स्थिती नाही. कचरा जमा करणाऱ्या महिलांना कार्ड देणार, एरिया ठरवून ते कचरा जमा करणार व विकणार. नवीन मॉडेल करण्यास वेळ लागेल. खर्च कमीत कमी कसा होईल? हा विचार करीत आहोत.

श्रीमती रेश्मा कुरैशी :माझ्या वार्डात शनीमंदीर जवळ मोठा कचरा पडलेला असतो वेळीच उचलण्यात यावा.

श्रीमती मुल्ला सलीमा बेगम:माझ्या वार्डात कर्मचारी कमी वेळीच कचरा उचलला जात नाही कुणीही अधिकारी वार्डात येत नाही.

मा.आयुक्त :श्री.झनझन यांनी या वार्डात पाहणी करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :मुख्य बाजारपेठेतील स्पॉट निवडून त्या ठिकाणी दोन वेळेस व सुट्टीच्या दिवशीही कचरा उचलला गेला पाहिजे. दिशा संस्कृती भागातील कचरा उचलला जात नाही. कचरा मुक्त शहर होण्यासाठी जनजागृती करावी.

श्री.विकास जैन :वार्ड रचने संबधी तातडीने कार्यवाही करावी. माझ्या वार्डात ३ जवान आहे. साफसफाईचे कर्मचारी कमी आहे.

श्रीमती कमल नरोटे :खुल्या जागेवर ओला सुका कचरा एकत्र टाकला जातो. त्यास पाणी सुटते. कचरा उचलल्यानंतर पावडर टाकणे, फवारणी केली जावी.

श्री.जमीर कादरी :वार्डनिहाय सफाई कर्मचारी कमी जास्त आहे. प्रमाणाकानुसार कर्मचारी दयावे. मकईगेट रस्त्यावर मोठे खड्डे पडले पर्यटक या रस्त्याने ये-जा करतात. तातडीने काम करावे.

श्री.राजू शिंदे :प्रत्येक वार्डात ओला-सुका कचऱ्यासाठी खड्डा केला तर ओला कचरा कुजेल व सुका कचरा विक्री होईल व नारेगाव येथे वाहतुकीसाठी लागणारा खर्चही कमी होईल. २५% कचरा डेपोवर जाईल नारेगाव येथील कचरा बंद करावा. यापुढे नागरीक कचऱ्याचा त्रास सहन करणार नाही.

श्री.अब्दुल मं.नाविद :माझा वार्ड स्लम आहे. साफसफाईसाठी जास्त कर्मचारी आवश्यक आहे. १०-१२ कर्मचारी पैकी ३ कर्मचारी नियमीत सुट्टीवर असतात. पुर्ण भागात साफसफाई होत नाही. वॉर्ड अधिकारी यांचेशी बोललो पण कार्यवाही होत नाही.

श्री.अजिम अहेमद :माझ्या वार्डाची लोकसंख्या १२ हजार आहे. १५ लेबर पाहिजे. आठ काम करतात. ७ लेबर नियमीत सुट्टीवर असतात.

श्री.सय्यद मतीन :माझा वार्ड स्लम झोपडपट्टी घोषीत आहे. पुर्वीपेक्षा वार्ड मोठे झाले. ३३ हजार लोकसंख्या आहे. आठ लेबर काम करतात. ०२ नियमीत सुट्टीवर असतात. बिस्मील्ला कॉलनीसाठी लेबर कमी आहे. मुकादम फोन बंद ठेवतात. कचरा कुंडी घाटी मकईगेट रिकाम्या जागेवर होती. आता ती रस्त्यावर ठेवली पुर्वीच्या जागेवर ठेवावी.

मा.आयुक्त :प्रमाणकानुसार कर्मचारी देण्याबाबत कार्यवाही केली जाईल.

श्रीमती मुल्ला सलीमा बेगम:वार्ड क्र.१०८ मध्ये शाळेचे काम सुरू केले होते. आठ महिने झाले बंद आहे. माहिती घ्यावी व तेथील शाळा सुरू करावी.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करून कार्यवाही करावी.

श्रीमती रेश्मा कुरैशी :माझ्या वार्डात १८ लेबर तर बाजूच्या समर्थनगर भागात २५ लेबर आहेत. ही तफावत का आहे.

श्रीमती निकाळजे आशा :वार्ड १३ मध्ये कर्मचारी कमी आहेत. वाढवून दयावे.

श्री.मनोज गांगवे :ओला-सुका कचरा वेगळा करण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे. माझ्या वार्डात कचरा आणून टाकतात. मोकाट जनावरे कचरा पसरवितात.

मा.आयुक्त :सहा महिन्यात बरीच कार्यवाही होईल. सदस्यांचे चांगले सजेशन आहे. ते विचारात घेतले जातील.

श्रीमती समीन शेख :यांत्रिकी विभागाचे कर्मचारी चांगले काम करीत नाहीत. लक्ष देण्याची गरज आहे.

श्रीमती वैशाली जाधव :माझ्या वार्डात कर्मचारी नाहीत, रिक्षा नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :प्रभाग रचना करणेचे अंतिम झाले आहे. कर्मचारी संख्या प्रमाणाकानुसार देऊ शकतो. सदस्यांच्या सुचना विचारात घेऊन कार्यवाही करावी. या कामात गती कशी आणता येईल? त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

मा.महापौर :सर्वच सदस्यांच्या सुचना जवळपास सारख्या आहेत. नवीन वार्ड रचनेनुसार २-३ वार्ड संलग्न राहणार नाही. वार्डाची भौगोलिक परीस्थिती व तेथील बाजार पेठ लक्षात घेता त्यानुसार स्वच्छतेसाठी लेबर लागणार आहेत. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सर्व नागरीक व स.सदस्य यांचे सहकार्य, यासाठी जनजागृती करणे आवश्यक आहे. म्हैसूर,सिमला पॅटर्न राबविण्यास वेळ लागेल. गुंठेवारी भागात खुल्या जागा नसतील परंतु मनपाच्या खुल्या जागा असेल तेथे एक दोन वार्डातील कचरा एकाच ठिकाणी टाकला जाईल. तसे डिस्पोजल करण्याचे नियोजन व्हावे या प्रस्तावात कंपनीचे स्पेसीफिक नाव दिले. परंतु कुठल्याही कंपनीचे नाव प्रस्तावात यायला नको. ते वगळावे हे

करीत असतांना स्पर्धा झाली पाहिजे. इकोफ्रेंडली वाहने घेता येतील का बघावे, प्रत्येक वार्डात कच-याचे नियोजन केले तर नारेगाव येथे कचरा जाणार नाही. साचलेल्या कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी नियोजन करावे. दुरूस्तीसह हा विषय मंजूर. शासनाकडून हा निधी येण्यासाठी सर्व या शहराचे मा.लोकप्रतिनिधी यांचे माध्यमातून प्रयत्न केला जाईल. शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. या विषयाप्रमाणे एक अवलोकनार्थ विषय आलेला होता त्याचा ही यामध्ये कन्टीन्यु करून त्यासही मंजूरी देण्यात येते.

श्री.नंदकुमार घोडेले :स्वच्छ भारत अभियांन अंतर्गत केंद्र शासनाकडे निधी साठी डीपीआर करून पाठवायचा तेही आदेशीत करून तात्काळ डीपीआर पाठविण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा विभागामार्फत स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची प्रभावीपणे अंमलबजावणी होणेसाठी कचरा संकलन व वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी वाहने ही जुन्या पध्दतीची तसेच निरुपयोगी झालेली असल्याने कचरा संकलन व वाहतुकीसाठी Close Bin's प्रत्येक निवडणूक वॉर्डासाठी एक याप्रमाणे ११५ आणि १० राखीव याप्रमाणे एकुण १२५ गाड्या आणि तीन Compactor खरेदीसाठी विशेष बाब म्हणुन १४ व्या वित्त आयोगामधून औरंगाबाद महानगरपालिकेला वाहने खरेदी करण्याकरीता निधी मिळणेसाठी शासनाकडे मागणी करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २४६**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर वसाहती विकसीत झाल्या आहेत. ज्या वसाहतींना बांधकाम परवानगी प्राप्त झाली नाही. त्यांना शासनाच्या गुंठेवारी कायद्याअंतर्गत नियमितीकरण करणेसाठी कायदा झाला आहे. महानगरपालिकेमध्ये देखील या कायद्यानुसार घरे,भुखंड नियमीत करून देण्यात आले आहे. मात्र महानगरपालिकेच्या विकास योजना आराखड्यानुसार ज्या ठिकाणी आरक्षणे आहेत. त्या ठिकाणी झालेल्या वसाहती गुंठेवारी कायद्यानुसार नियमीत करून दिलेल्या नाहीत. यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच अशा वस्त्यांना सुखसुविधा पुरविणे बाबत देखील महानगरपालिकेवर ताण पडत आहे. या भागातील बहुतांश नागरीकांची त्यांची घरे गुंठेवारी कायद्याअंतर्गत नियमीत करून घेण्याची तयारी आहे. विकास योजनेमध्ये ज्या ठिकाणी आरक्षणे आहे. परंतु प्रत्यक्ष जागेवर वसाहती विकसीत झाल्या आहे असे आरक्षणे महानगरपालिकेस विकसीत करणे देखील शक्य नसल्याने नागरीकांची मागणी विचारात घेता अशी आरक्षणे रद्द करून त्या ठिकाणी विकसीत झालेल्या वस्त्या गुंठेवारी कायद्यानुसार नियमीत करून दिल्यास महानगरपालिकेला मोठ्या प्रमाणावर महसूल प्राप्त होईल तसेच मालमत्ता कर देखील नियमीत प्राप्त होईल.

करीता वरीलप्रमाणे विकास योजना आराखड्यानुसार ज्या ठिकाणी आरक्षणे आहेत. त्या ठिकाणी झालेल्या वसाहती गुंठेवारी कायद्यानुसार नियमीत करून त्या ठिकाणी असलेली आरक्षणे रद्द करण्याची कार्यवाही महानगरपालिकेने हाती घेणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य **अनुमोदक:-** श्रीमती मिनाताई रामदास गायके

**संवाद:-**

श्री.रेणुकादास वैद्य :शहरात २५ टक्के लोक गुंठेवारी स्लम भागात राहतात. या भागात नियमीत कॅम्प लावणे व घरे नियमित करणेची कार्यवाही होत असते. परंतु अनेक भागात रिझर्वेशनच्या जागेवर १०-२० वर्षापासून पुर्णपणे घरे झाली. अशी वस्ती पुर्ण भुईसपाट करू शकत नाही. हया वसाहती रेग्युलर करणेसाठी जो डीपी प्लॅन येतो त्यातून हे वगळू शकतो किंवा नव्याने टाकू शकतो.मा.कोर्टाच्या आदेशाप्रमाणे ३७ ची कार्यवाही करण्या संबधी महापालिकेला आलेले आहे. डीपी प्लॅनमध्ये जे सजेशन, ऑब्जेक्शन घेणार आहे. त्यामध्ये त्यानुसार ठराव प्रशासनाच्या वतीने येण्याची गरज आहे. कार्यवाही आवश्यक आहे. ज्या आरक्षीत जागेवर घरे झाली. लोक राहतात ती आरक्षणे हटविली तर ते रेग्यूलर करता येतील. महापालिकेस उत्पन्न मिळेल. या भागात आजही सुविधा देतो. गरीब लोकाना न्याय मिळेल. हा विषय मंजूर करावा.

श्री.नासेर सिद्यीकी :आरक्षण हटवू शकतो का? विधी विभागाची माहिती घ्यावी.

श्री.गजानन बारवाल :डीपी प्लॅन करतांना प्रशासनाने हे करावे. गुंठेवारी भाग नियमीत करता येईल. यास मंजूरी दयावी.

श्रीमती संगिता वाघुले :वार्ड ३४ मध्ये मा.आयुक्त यांनी भेट दिली. तेथील समस्या जाणून घेतल्या आयुक्ताचे मी अभिनंदन करते. गुंठेवारी रेग्युलर करण्यासाठी कॅम्प घेतला जाणार आहे प्रशासनाने साथ दयावी. या वार्डात १५ वर्षापासून कोणतेही काम झालेले नाही.

श्री.सिताराम सुरे :गुंठेवारी संदर्भात अनेक ठराव निर्णय घेतले कार्यवाही होत नाही. येथे विकास कामे व्हावी. १८ खेडी समाविष्ट केली त्यात हर्सुल गाव येथे वाडया-वस्ती असून सुरेवाडीत भाग येतो. हा भाग गुंठेवारीत येतो. काम करता येत नाही असे सांगतात. विनंती की कायदयाच्या चौकटीत बसून या वसाहती नियमीत कराव्यात. आरक्षीत जागेवर वेळीच मार्कीग केली असती तर वसाहती व तेथील खरेदी विक्रीचे व्यवहार झाले नसते. डीपी प्लॅन मधून आरक्षीत जागा वगळाव्यात.

श्री.राजगौरव वानखेडे :कायदेशीर अडचण काय खुलासा घ्यावा. २५ टक्के लोक गुंठेवारी भागात राहतात. येथे कामे करता येत नाही अधिकारी सांगतात तर मतदान चालते व विकास कामे का होत नाही? नागरीक आम्हाला विचारणा करतात. डीपी प्लॅन मधून आरक्षीत जागा वगळाव्या. २००१ पर्यतच गुंठेवारी कायदा आहे तो २०१० पर्यत करावा. शासनाकडे प्रस्ताव पाठवाला होता त्याचे काय झाले.

श्री.मो.अय्युब जहागीरदार:या भागात सुविधा देत नाही. अनधिकृत बांधकाम होते. गुंठेवारीतील आरक्षण हे २५-३० वर्षापासून टाकले, ताब्यात घेतले नाही. जमीन मालकास पैसे दिले नाही. त्यामूळे कालातंराने घरे झाली. गरीब नागरीकांनी पुर्ण आयुष्याची कमाई तेथे खर्च केली. प्रत्येकास वाटते माझे घर असावे. त्यामूळे गुंठेवारी भागातील आरक्षीत जागा वगळाव्यात. अल्तमश कॉलनी भागात रहिमनगर ३० वर्षापासून वस्ती आहे. तेथे सुविधा नाही. नागरीकांनी स्वत:च्या खर्चाने सुविधा करून घेतल्या.

दुरवरून पाणी आणले व ती इलिगल वस्ती आहे. असे समजून काम करणार नसेल तर योग्य नाही. गुंठेवारी भागात सर्व समाजाचे लोक आहे. अशा वसाहती रेग्यूलर कराव्यात. महापालिकेचे उत्पन्न वाढवावे.

श्रीमती अर्चना निळकंठ :माझ्या वार्डात श्रीकृष्णनगर हा भाग गुंठेवारीत येतो तेथे रस्ता लाईट पाणी या सुविधा नाही.

श्री.नंदकुमार घोडेले :हा विषय मंजूर करावा. डी पी प्लॅनशी हा विषय संलग्न आहे. डीपी प्लॅन केंव्हा सादर करणार आहे?

श्रीमती सत्यभामा शिंदे :गुंठेवारी भाग वार्ड “ई” मध्ये जास्त आहे. प्रस्ताव मंजूर केल्यानंतर या भागातील विकास कामासाठी काय नियोजन केले जाईल?

मा.आयुक्त :गुंठेवारीची बैठक घेतली. ११७०० अर्ज आले. ३५०० अर्जावर निर्णय होणे बाकी आहे. यासाठी पिरीयड ठरवून दिला की निर्णय घ्यावा लागेल. गुंठेवारीमध्ये काही मिस-कन्ट्रक्शन होते काही समज अधिकारी यांचे होते असे वाटते. शासनाचा जीआर वाचला तर एरिया रेग्युलाईज करण्यासाठी ते आहे. तांत्रिकदृष्टया तो भाग रेग्युलर करायला पाहिजे त्यात असे ही आहे की, काही इन्डिव्हिज्युअल प्लॉट रेग्युलाईज करू शकतो. आताच म्हटले की तेथे बांधकाम झाले परंतु बांधकाम व गुंठेवारी प्लॉट रेग्युलाइज करणेचा काही संबध नाही. बांधकाम अनधिकृत असेल त्यास दंड लावून रेग्युलाईज करणेचा विषय वेगळा आहे. २००१ ची गुंठेवारी आहे ती रेग्यूलाईज करावी लागेल. एवढी मोठी गुंठेवारी असतांना अर्ज कमी का आले? सिडकोत असते तर रेग्यूलाईज झाले नसते. महापालिकेत आहे. शासनाच्या जीआर आधारे रेग्युलर होऊ शकेल. इन्डिव्हिज्युअल प्लॉट १० लोक आहे ८ लोक नियमीत करण्यास तयार आहेत तर त्यांचे नियमीत झाले पाहिजे. २००१ च्या अगोदरची रजिस्ट्री असेल तर ते नियमीत करू शकतो. हे अधिकार नगर रचना विभागास देण्यात येतील. प्रत्येक वार्डातील लोकांना गुंठेवारी नियमीत करण्यासाठी आपणाला सांगावे लागेल अर्ज आले पाहिजे. हे काम पुन्हा सुरू केले रिस्पॉन्स येत नाही. असे कर्मचा-यांचे म्हणणे आहे. गुंठेवारी नियमीत करण्यासाठी कायद्यानुसार लागणारी कागदपत्रे देणे आवश्यक आहे. याबाबत प्रेस नोट देण्याचे वार्डात जाऊन सांगणे हे करण्याच्या सुचना दिल्या. गुंठेवारी काय करायची हे लोकांना समजावून सांगावे लागेल. २०१० पर्यंतची गुंठेवारी नियमीत करण्याबाबत काय कार्यवाही होत आहे? माहिती घ्यावी लागेल. प्रस्ताव दिला असला तरी शासनाला पुर्ण महाराष्ट्राचा विचार करून धोरण ठरवून निर्णय घ्यावा लागणार आहे. गुंठेवारी नियमीत झाली तर नागरीकांना सोई-सुविधा देण्याकरीता सोयीस्कर होईल. आरक्षण काढता येते की नाही मा.न्यायालयाचे काय निर्देश आहे? सर्व कायदेशीर बाबी तपासून कार्यवाही करता येईल.

श्री.राजू शिंदे :या विभागात नियमीत अधिकारी नाही. त्यांना गुंठेवारी काय कळाले नाही? भौगोलिक दृष्टया या शहरात २०X३० प्लॉट आहे. पश्चिम महाराष्ट्रात गुंठेवारीचा प्लॉट त्यात बांधकामही तेवढेच होते. या शहरात

काहींनी एकाच प्लॉटमध्ये दोन मालक आहेत. अर्धा प्लॉटसाठी गुंठेवारीत घेण्यासाठी २५ हजार खर्च भरू शकत नाही. ज्या त्या भागातील प्लॉटच्या किंमतीनुसार गुंठेवारीची रक्कम भरणा करून घेण्यासाठी तेथील नागरीकांना सवलत दयावी. गुंठेवारी भागात गरीब कामगार वर्ग आहे. कमाई कमी खर्च जास्त अशी परीस्थिती आहे. या भागात १० टक्के ओपन जागा असावी. ९ मीटरचे रस्ते असावेत, असे होते शहरात सुध्दा असे नाही. माझ्या माहिती प्रमाणे जेवढे आरक्षण बदलले होते त्यावर मा.न्यायालयाची स्थगिती होती. जागा रिकामी असेल त्या आरक्षीत जागा ताब्यात घ्याव्यात. जेथे १०० टक्के बांधकाम झाले ते लिगली सर्व बघून आरक्षण वगळावे.

श्री.रेणुकादास वैद्य :नियमानुसारच कार्यवाही करावी. मा.उच्च न्यायालयाने ३७ ची कार्यवाही करण्यास बंद केले. अनेक आरक्षण निघत होते. मा.उच्च न्यायालयाला स्वतःहून याचिका दाखल करावी लागली व ते आरक्षण काढत असतांना न्यायलायाची परवानगी घ्यावी असे म्हटले. हा विषय वेगळा ३७ ची कार्यवाही करण्याचे सजेस करीत नाही. जो डीपी प्लॅन येईल त्यामध्ये करेक्शन करावे. जेथे खुली जागा आहे तेथे आरक्षण टाकता येईल. काही ठिकाणी नावाला आरक्षण आहे. त्याचा वापर नाही. आताच म्हटले की, या भागातून गुंठेवारीसाठी अर्ज जास्त यायला पाहिजे परंतु या भागातील लोक कमी शिकलेली आहेत. हे कामगार वर्ग आहे. त्यांचेत भिती निर्माण झाली ती काढावी. वार्डवाईज कॅम्प लावावे. जागेवर निर्णय घेतला पाहिजे. यामूळे उत्पन्न वाढेल.

मा.आयुक्त :कॅम्प लावण्याची कार्यवाही होईल. रेग्युलाईज झाले पाहिजे. ही प्रशासनाची भुमीका आहे.

मा.उपमहापौर :नागरीक गुंठेवारी रेग्यूलर करण्यासाठी येतात. कर्मचारी अनेक कारणे सांगून परत पाठवितात. तोच प्लॉट कर्मचारी विकत घेतात. नंतर लगेच गुंठेवारी होते. असे निदर्शनास येते. माझ्या वार्डात गुंठेवारी भागात मोकळी ओपनस्पेस व रस्त्यासाठी जागा हॅडवर्क केली मात्र तेथे गुंठेवारीमध्ये परवानगी देत नाही. त्यांचे समोरचे प्लॉट रेग्युलाईज होतात. वार्ड कार्यालयातील कर्मचा-यांवर कन्ट्रोल असावे. जे कुणी येतील त्यांची संचिका दाखल करून घ्यावी. नोंद व्हावी. कागदपत्र घ्यावे. कार्यवाही करावी.

श्री.जहागींर खान :गुंठेवारी रेग्युलर करण्यासाठी लोक येतात. त्यांना १०-१० हजार खर्च सांगतात. ते परत जातात. इलिगल घर बांधतात. चंपाचौक, रोषण गेट भागात इलिगल ३-३ मजली इमारती झाल्या यात कर्मचा-यांची कुठेतरी चूक होत आहे रेग्यूलर करून घेत नाही.

मा.आयुक्त :जे इलिगल बांधेल त्यांचेवर कार्यवाही करून अनेकांना या गुठेवारी संदर्भात माहिती नाही. गुंठेवारी करून घेणे बाबत सांगावे लागेल. ज्यांनी इलिगल बांधले त्यांना २००१ चा कायदा लागू पडतो का? ते तपासावे लागेल.

श्री.राजू शिंदे :गुंठेवारीतील अनधिकृत बांधकाम थांबले असते तर बांधकाम झाले नसते.

श्री.राजगौरव वानखेडे :दुसरे चलनाच्या वेळी पैसे भरून घेत नाही. अनेक क्यूरीज काढल्या जातात.

मा.आयुक्त :यासाठी एक नमुना फॉर्म प्रिन्ट केला जाईल. तो नागरीकांपर्यत पोहचविला जाईल. त्यांनी संपुर्ण कागदपत्रांसह तो भरून द्यावा.

श्री.राजू शिंदे :जेथे घरे व बांधकाम झाले तेथीलच घरे लिगल व्हावी. भारतनगर भागात गुंठेवारीमध्ये घेऊन लिगल केले व नंतर प्लॉटींग म्हणून विक्री झाले.

श्री.नंदकुमार घोडेले :गुंठेवारीच्या नावाखाली ले-आऊट मंजूर केले. त्याची चौकशी व्हावी. बांधकाम परवानगी, गुंठेवारी विभाग प्रशासकीय विभाग एकाच अधिकाऱ्याकडे देण्यात यावी. गुंठेवारी करण्यास सोयीस्कर होईल.

श्री.जहागींर खान :ज्यांनी गरीबाना फसविले त्यांचेवर कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :पुरावा असेल तर कार्यवाही होईल.

श्री.सुभाष शेजवळ :ग्रीन-झोनमध्ये गुंठेवारी करता येत नाही असे सांगतात. तेथेही गुंठेवारी करावी.

श्रीमती मिना गायके :गरीब लोकांचे बांधकाम थांबविले जाते. परंतु काहींनी दोन नळ कनेक्शन घेवून तीन-तीन मजली बांधकाम केले ते थांबविले जात नाही.

श्री.रावसाहेब आमले :गट क्र.५/२ मध्ये वरद हॉटेल आहे. २००९ मध्ये प्लॉट घेतला तेथे गुंठेवारी कशी करण्यात आली? मनपास फसविले आहे. त्यांचेवर गुन्हे दाखल करावे.

मा.आयुक्त :लेखी दयावे. जेथे अनधिकृत नळ घेतले. श्री. कोल्हे यांनी कार्यवाही करावी.

कक्ष प्रमुख, गुंठेवारी :संबधीतास नोटीस दिली. मुदतीत कागदपत्र दाखल न केल्यास रद्द केले जाईल.

श्री.राजगौरव वानखेडे :गुंठेवारी भागात टीडीआर देतो. परंतु तेथील गुंठेवारी होत नाही. चौकशी करावी.

मा.आयुक्त :दोन टीडीआरची चौकशीचा अहवाल आलेला आहे. पुर्ण माहिती येईल तेंव्हा त्यावर कार्यवाही होईल. अंतिम माहिती समोर येईल निर्णय होईल तेंव्हा सर्वसाधारण सभेपुढे येईल. महाराष्ट्र टाईम्स मध्ये जी बातमी आली त्यांची चौकशी करण्याचे आदेशीत केले आहे. कार्यवाही करण्या अगोदर पुरावे असणे आवश्यक आहे ते जमा करण्याचे काम चालू आहे. ज्यांचे बाबतीत आक्षेप आहे त्याचेकडून सुध्दा नैसर्गिक न्याय तत्वानुसार संबधीताचे म्हणणे ऐकूण घ्यावे लागेल.चुकीने ॲक्शन घेतल्यास जर न्यायालयात कुणी गेल्यास त्यावर लगेच ॲक्शन होते.

श्री.नितीन चित्ते :जिल्हाधिकारी कार्यालया समोरील जो टीडीआर दिला त्याची सर्व कागद मी दिले. ज्यांनी टीडीआर घेतला त्यांचेवर बँकेने गुन्हा दाखल आहे. त्या जागेवर बॅकेचे १.३० कोटी कर्ज आहे. महापालिकेने का गुन्हा दाखल केला नाही? अहवाल आला असेल तर सादर करावा.

मा.आयुक्त :एक अहवाल आलेला आहे. तो वाचला त्यात ४ शिफारशी केल्या. टीडीआर रद्द करण्याची प्रोव्हीजन नाही किंवा आहे ते पहावे लागेल. माहिती यायची ती आल्यानंतर सादर करता येईल. संबंधीतास नोटीस देऊन त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले जाईल. त्यानंतर कार्यवाही होईल.

मा.महापौर :सभा एक तासासाठी तहकूब करण्यात येते (वेळ १.०५ पुन्हा सभेला सुरूवात २.५५)

मा.महापौर :महत्वाचा विषय ४०-४५ वार्ड गुंठेवारीत येतात. सदस्यांच्या भावना लक्षात घेता गावठाण जमिन तेथे गुंठेवारी करण्यास अडचणी येतात. या बाबत सर्व शहराचा विचार करून या विषयाच्या माध्यमातून चांगले काम होऊ शकेल. या ठरावाच्या संदर्भात सर्व कायदेशीर बाबी तपासून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासनाच्या गुंठेवारी कायद्याअंतर्गत गुंठेवारी भाग नियमितीकरण करण्यासाठी महानगरपालिकेच्या विकास योजना आराखड्यानुसार ज्या ठिकाणी आरक्षणे आहेत त्या ठिकाणी झालेल्या वसाहती गुंठेवारी कायद्यानुसार नियमीत करून त्या ठिकाणी असलेली आरक्षणे रद्द करण्याची कार्यवाही करण्याकरीता सर्व कायदेशीर बाबी तपासून आवश्यक ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक २४७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४४ रोशनगेट मधील नाल्यावर स्लॅब टाकलेला आहे परंतु मेन सिवर लाईनच्या महत्वपुर्ण कामासाठी सदरील स्लॅब तोडण्याची आवश्यकता आहे.

सदरील नाल्यावरील स्लॅब तोडण्याची परवानगी मिळण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती साजेदा सईद फारूकी **अनुमोदक:-** श्री.शेख अब्दुल रहिम नाईकवाडी

श्री.रेणुकादास वैद्य :नियमानुसार कार्यवाही करावी.

मा.महापौर :नियमानुसार कार्यवाही करावी.विषय मंजूर

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४४ रोशनगेट मधील नाल्यावरील स्लॅब मेन सिवर लाईनच्या महत्वपुर्ण कामासाठी नाल्यावरील स्लॅब तोडण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक २४८</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सुका कचरा, ओला कचरा वेगळा करण्याकरिता डस्ट बिन्सची आवश्यकता आहे. सदरील डस्ट बिन स.नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीमधुन खरेदी करण्यास मान्यता देणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:**श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले

**अनुमोदक:** श्री.जाधव बन्सी ग्यानू,श्रीमती स्वाती किशोर नागरे

श्री.रेणुकादास वैद्य :सीसीटीव्ही कॅमेरेही स्वेच्छानिधीतून वार्डात देता येत असेल तर दुरूस्तीसह मंजूर करावे.

मा.महापौर :दुरूस्तीसह मंजूर

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुका कचरा, ओला कचरा वेगळा करण्याकरिता डस्ट बिन्स स.नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीमधुन खरेदी करण्यास मंजुरी देण्यात येते तसेच सीसीटीव्ही कॅमेरेही स्वेच्छानिधीतून वार्डात देता येत असल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक २४९</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नारेगांव येथील कचरा डेपोमधील असलेला कचरा अनेक वर्षापासुन व रोज येणारा कचरा यामुळे कचरा ग्राऊंडची जागा अपुरी पडत असुन कचऱ्याचे मोठ्या प्रमाणात डोंगर साचलेले आहेत. त्यावर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया केल्या जात नाही. त्यामुळे तेथील कचरा शेतकऱ्यांना खत निर्मीती करण्यासाठी मोफत देण्याकरीता आव्हान करण्यात यावे. त्यासाठी लागणारे अवजारे, जेसीबी इ.त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावे. त्यामुळे कचरा खत म्हणून वापरण्यात येईल व मनपाचे वाढत असलेले कचऱ्याचे डोंगर कमी होईल. यामुळे मनपाचा एक प्रकारचा फायदाच आहे. तसेच त्याठिकाणचे वर्तमानपत्रात जाहिर प्रगटन देऊन फलक लावण्यात यावे.

करीता सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:**श्री.गोकुलसिंग संपतसिंग मलके **अनुमोदक:** श्री.राजु रामराव शिंदे.

श्री.नंदकुमार घोडेले :मागे ही असाच ठराव घेतला होता सर्व नियोजन करून कार्यवाही करावी

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारेगांव येथील कचरा डेपोमधील असलेल्या कचऱ्यावर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया केल्या जात नसल्याने तेथील कचरा शेतकऱ्यांना खत निर्मीती करण्यासाठी मोफत देण्याकरीता वर्तमानपत्रात जाहिर प्रगटन देऊन सदर ठिकाणी फलक लावून कार्यवाही करण्यास व त्यासाठी लागणारे अवजारे, जेसीबी इ.त्यांना उपलब्ध करुन देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक २५०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आपल्या महानगरपालिकेच्या सर्व मराठी आणि ऊर्दु शाळां मध्ये संगणक (कॉम्प्युटर) शिक्षण विद्यार्थ्यांना देणे अत्यंत गरजेचे आहे. कारण या स्पर्धेच्या काळामध्ये इंग्लिश शाळेचे शिक्षण घेणारे विद्यार्थ्यांचा समाजामध्ये बरोबरी करण्यास व शिक्षणाचा दर्जा उच्च होण्या करीता महानगरपालिका शाळेमध्ये गोरगरीब विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण देण्याचे नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचक:**श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी

**अनुमोदक:** श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण,श्री.गंगाधर नामदेव ढगे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्व महानगरपालिका मराठी आणि ऊर्दु शाळां मधील गोरगरीब विद्यार्थ्यांना संगणक (कॉम्प्युटर) शिक्षण देण्याचे नियोजन करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २५१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर ही मराठवाड्याची राजधानी आहे. या शहरात अजिंठा,वेरुळ, दौलताबाद किल्ला व पानचक्की, बिबीका मकबरा ही ऐतिहासिक स्थळे बघण्याकरीता देश विदेशातून असंख्य पर्यटक येतात. परंतू शहरामध्ये प्रवेश केल्यानंतर वरील पर्यटन स्थळांना भेटी देण्याकरीता मोटारीने व बसेसने येणे जाणे सुरू असते. सर्व पर्यटकांना विविध पर्यटन स्थळांना जाण्याकरीता जागोजागी थांबून रस्ते विचारावे लागतात.

पर्यटकांचा त्रास वाचविण्याकरीता विविध ठिकाणी दिशादर्शक फलके लावण्याकरीता व नगर नाक्या पासुन विविध ठिकाणी दिशा दर्शक फलके लावण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:**श्री.अफसर खान यासीन खान

**अनुमोदक:** श्री.खान फेरोज मोईनोद्दीन,श्री.गंगाधर नामदेव ढगे.

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील ऐतिहासिक स्थळे बघण्याकरीता येणाऱ्या पर्यटकांसाठी नगर नाक्यापासुन ते शहरात विविध ठिकाणी ऐतिहासीक स्थळांचे दिशादर्शक फलके लावण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २५२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.९६ मधील आदिनाथनगर ते मल्हार चौकाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या (जवाहरनगर पो.स्टे.समोरील रस्ता) प्रवेशद्वारास “जय मल्हार प्रवेशद्वार” असे नाव देण्यात यावे अशी परिसरातील नागरीकांची इच्छा आहे.

नागरिकांच्या भावनेचा आदर ठेवून सदरील रस्त्याच्या प्रवेशद्वारास “जय मल्हार प्रवेशद्वार” असे नाव देण्या बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मान्यतेस्तव सादर.

**सुचक:**श्रीमती विमल गोविंद केंद्रे

**अनुमोदक:** श्रीमती देशमुख माधुरी मिलींद

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.९६ मधील आदिनाथनगर ते मल्हार चौकाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या (जवाहरनगर पो.स्टे.समोरील रस्ता) प्रवेशद्वारास “जय मल्हार प्रवेशद्वार” असे नाव देण्या करीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २५३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.९६ मधील आदिनाथनगर ते मल्हार चौक रस्त्यावरील म.न.पा.च्या वतीने सुरु असलेल्या दवाखान्यास “स्व.मा.श्री.अशोकजी सिंघल” यांचे नाव देण्यासाठी सदरील भागातील नागरीकांची इच्छा आहे.

सदरील भागातील नागरिकांच्या भावनेचा आदर करुन मनपाच्या आरोग्य केंद्रास “स्व.मा.श्री.अशोकजी सिंघल प्राथमिक आरोग्य केंद्र” असे नाव देण्या बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**सुचक:**श्रीमती विमल गोविंद केंद्रे **अनुमोदक:** श्रीमती देशमुख माधुरी मिलींद

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.९६ मधील आदिनाथनगर ते मल्हार चौक रस्त्यावरील मनपाच्या सुरू असलेल्या आरोग्य केंद्रास "स्व.मा.श्री.अशोकजी सिंघल प्राथमिक आरोग्य केंद्र" असे नाव देण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २५४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक १०७ मध्ये नाथपुरम भागात महापालिकेचा एक हॉल/सांस्कृतिक सभागृह असून त्यास या भागातील नागरीकांच्या लेखी निवेदनानुसार, मागणीनुसार श्री संत एकनाथ सभागृह असे नाव देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचक** श्री.नंदकुमार घोडेले **अनुमोदक** श्री रेणुकादास (राजू)दत्तोपंत वैद्य

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्रमांक १०७ मध्ये नाथपुरम भागात महापालिकेच्या हॉल/सांस्कृतिक सभागृहास या भागातील नागरीकांच्या लेखी निवेदनानुसार व मागणीनुसार श्री संत एकनाथ सभागृह असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २५५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भिमनगर-भावसिंगपूरा मेनरोडवर भव्य मोठी अशी कमान बांधण्यात आलेली आहे.त्या कमानीला सांची प्रवेशद्वार असे नाव देण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर

**सुचक** :श्रीमती आशाताई विजय निकाळजे **अनुमोदक** :श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भिमनगर-भावसिंगपूरा मेनरोडवर बांधण्यात आलेल्या कमानीला सांची प्रवेशद्वार असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २५६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रेस रिपोर्ट प्रमाणे महानगरपालिका औरंगाबादचे धार्मिक स्थळांचे पुनरसर्वेक्षण प्रस्तावाला राज्य शासनाने खारीज केल्याचे दिसते. परंतु प्रस्ताव खारीज केल्याबाबतीत प्रसिध्दी देण्यात आलेली नाही असे दिसते. याउलट महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने धार्मिक स्थळांचे शासनाने प्रस्ताव खारीज केला याला प्रसिध्दी न मिळाल्यामुळे बऱ्याच प्रार्थना स्थळांच्या समित्यांना माहिती नसल्याची शक्यता आहे व त्यामुळे त्यांनी महानगरपालिका औरंगाबाद तर्फे दिनांक ०७.११.२०१५ रोजी दिलेल्या नोटीसीला दिनांक ०७.१२.२०१५ पर्यंत उत्तर न देण्याची शक्यता आहे. तरी सदरील नोटीसीला उत्तर देण्याकरीता वेळ वाढवून देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:** श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम **अनुमोदक:** श्रीमती सरवत बेगम आरेफ हुसैनी

श्री.रेणुकादास वैद्य :सोसायटी किंवा खुल्या जागेवर असेलेली धार्मीक स्थळे डीसी रूल नुसार महापालिकेच्या खुल्या जागेमध्ये २०० स्क्वे.मीटर पर्यत किंवा ओपनस्पेसच्या १० टक्के पर्यत बांधकाम परवानगी आहे. त्यानुसारच बॅडमिंटन, टेबल-टेनिस हॉलची बांधकामे केलेली आहे. मंदीर,मस्जीद येथे प्रार्थना,प्रवचन,किर्तन होतात. हया ॲक्टीव्हिटीज खुल्या जागेशी

निगडीत येतात. नियम १३.१ चा आधार घेऊन प्रार्थना स्थळ, मंदीर असेल ते रेग्यूलर करता येते. तशा सुचना देण्यात याव्यात. यामध्ये महापालिकेला टॅक्स मिळेल व परवानगीचे पैसे मिळेल. ८० टक्के प्रकरणे मार्गी लागतील.

श्री.नंदकुमार घोडेले :धार्मीक स्थळांबाबत ४ ऑक्टो-२०१० व १४ मार्च-२०११ शासनाचे परिपत्रक आहे. त्यात पान क्र. ४ वर दिले की, १ मे १९६० च्या आधीचे व नंतरचे धार्मीक स्थळाच्या बाबतीत राज्य व जिल्हा स्तरावर समीती आहे, कोणी कसे काम करावे? हे त्यात दिले. १ मे १९६० पुर्वीचे धार्मीक स्थळे निष्काषित करणेपुर्वी राज्य पुर्व समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. ते न बघता धार्मीक स्थळांच्या बाबतीत अहवाल केला. १९६० च्या अगोदरची व त्यानंतरची धार्मीक स्थळे कोणती? याची वेगळी यादी केली का ?

उपअभियंता :१९६० च्या नंतरची धार्मीक स्थळांच्या बाबतीत महापालिका निर्णय घेईल. याची प्रारूप यादी केली. यासाठी सदस्य सचिव म्हणून उपआयुक्त आहे. यादी अंतिम करतांना या सर्व गोष्टींची काळजी घेतली जाईल.

श्री.नंदकुमार घोडेले :प्रारूप यादी केली असली तरी नोटीस सुचना हरकती मागितल्या नाही. यादी प्रसिध्द केली प्रोसेस पुर्ण केली नाही. १९६० च्या आधीची व नंतर अशी यादी देणे आवश्यक होती. अनधिकृत धार्मीक स्थळे आहे हे समितीने ठरवायला पाहिजे. राज्य शासनाकडे न पाठविता प्रसिध्द करू शकतो का?

उपआयुक्त (प्र) :५ मे २०११ चा शासन जीआर आहे. यात शासनाची तसेच जिल्हा महापालिकेत मा.आयुक्त यांचे स्तरावर समिती आहे. शासन जीआर येणेपुर्वीच सर्वे केलेला आहे. राज्य स्तरीय समितीकडे यादी पाठविली नाही. जुने धार्मीक स्थळांची नावे यादीत आहे. १९६० च्या अगोदरची व त्यानंतर कोणती व्हेरीफिकेशन करता येईल.

श्री.नंदकुमार घोडेले :१९६० च्या अगोदरची यादी राज्यस्तरीय समितीकडे पाठवून प्रसिध्द करायला पाहिजे होती. न पाठविता प्रसिध्द करण्याचा अधिकार महापालिकेला नाही.

उपआयुक्त (प्र) :नगररचना विभागाकडून प्रसिध्द करण्याची कार्यवाही झाली. माझ्याकडे संचिका आली नाही. नगररचना कडून खुलासा होणे अपेक्षीत आहे.

उपअभियंता(श्री.देशमुख):प्रारूप यादी केली. १९६० च्या अगोदरचे की नंतरचे बरेचसे पुरावे आता सादर झाले. ते विभागणी करून यादी करता येईल.

श्री.नंदकुमार घोडेले :अधिकृत अनधिकृत कशाच्या आधारे ठरविले, एखादे धार्मीक स्थळाचे नाव नसेल व अधिकृत प्रत आणून दिले तर कसे ठरविणार आहे. नगररचना विभागाचे प्रमुख यांचाही कमेटीत समावेश असावा.

श्री.रेणुकादास वैद्य :नव्याने सर्वेक्षण करावे सदस्यांना, नागरीकांना त्या धार्मीक स्थळांचे ट्रस्टी कोण? धर्मगुरू कोण? या सर्वांचे मत जाणून घ्यावे. पॉझिटिव्ह पध्दतीने काम करावे.

श्री.सिद्यीकी नासेर :जे जबाबदार लोक आहे, धर्मगुरू आहे, त्यांचेकडे मस्जीद, मंदीरचा पुर्ण रेकॉर्ड आहे. माहिती घ्यावी.

श्री.शेख अब्दुल ताहेर :शासन जीआर व न्यायालयाचा निकाल यात स्पष्ट म्हटले की, प्रत्येक प्रकरणात निर्णय घ्यावा. हे एकाच यादीत पब्लीश केले. तसे करता येत नाही. पुन्हा सर्वेक्षण करावे. ठराव घेतला. शासनाने नामंजूर केला असे वृत्तपत्रात आले. बरोबर आहे का ?

मा.महापौर :यापुर्वीही हा विषय चर्चेला आला की, पुन्हा धार्मीक स्थळांचा नव्याने सर्वेक्षण व्हावे. अशा वेळी तेथील नागरीक, ज्येष्ठ नागरीक स.सदस्याचा सहभाग असावा. मंदीर, मस्जीद, चर्च असेल, सर्वे करत असतांना जे ट्रस्टी, धार्मिक धर्मगुरू असतील त्यांचेकडून पुर्ण माहिती घेऊन सर्वे करावा. अनेक सोसायटीमध्ये ओपनस्पेस तेथे नियमानुसार १० टक्के बांधकाम असेल तर तेथील धार्मिक स्थळ नियमीत करता येते का विचार करावा १९६० च्या अगोदरचे धार्मीक स्थळ बाबत राज्यस्तरीय समितीकडे पाठवावे लागते. शासन जीआर आहे. असे म्हटले. सर्व नियम तपासून पहावे. यात वार्ड अधिकारी दुय्यम अवेक्षक, नगररचना विभागाचे अधिकारी तसेच ज्यांना जागेची त्या भागाची माहिती आहे अशांचा सहभाग घेवून सर्वेक्षण व्हावे. यापुर्वीच सर्वे केला तो फक्त धार्मीक स्थळे किती? याची गणना करण्यात आली असावी. २००७ च्या पुर्वीचे स्थळे यात घेतली असावी. हे सर्वेक्षण योग्य नव्हते. मा.आयुक्तांशी चर्चा केली व पुन्हा सर्वेक्षण करण्याचे सुचना दिल्या पुन्हा सर्वेक्षण करावे कुणाच्याही धार्मीक भावना दुखावल्या जाणार नाही याची दखल घ्यावी. यादी तयार करून सर्व सदस्यांना दाखवावे व सर्वसाधारण सभेपुढे ती यादी सादर करावी.

श्री.नितीन चित्ते :वाहतुकीला कुठलाही अडथळा होणार नाही. ती धार्मीक स्थळे विचारात घेतली पाहिजे.

मा.महापौर :जुनी धार्मीक स्थळे डीपी रोडमध्ये बाधीत होत नसेल तर विचार केला पाहिजे. नवीन सर्वे करीत असतांना काळजी घ्यावी. या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

श्री.नंदकुमार घोडेले :१९६० च्या पुर्वीची यादी राज्य स्तरीय समितीकडे पाठवावी. त्यांचेकडून अंतिम होऊन आल्यानंतर ती प्रसिध्द करावी. त्यापुर्वी प्रसिध्द करण्याचा अधिकार नाही.

मा.महापौर :स.सदस्य श्री. नंदकुमार घोडेले यांनी केलेली सुचना विचारात घेऊन कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेने धार्मिक स्थळांच्या संदर्भात शासनाकडे दिलेला प्रस्ताव खारीज केला असल्यास याला प्रसिध्दी न मिळाल्यामुळे बऱ्याच प्रार्थना स्थळांच्या समित्यांना माहिती नसल्याने महानगरपालिकेतर्फे दिनांक ०७.११.२०१५ रोजी दिलेल्या नोटीसीला उत्तर देण्याकरीता वेळ वाढवून देण्यात येते. तसेच नव्याने धार्मिक स्थळांचे सर्वेक्षण करावे ते करतांना वॉर्ड अधिकारी, दुय्यम अवेक्षक, नगर रचना अधिकारी यांना माहिती आहे. त्यांनी तेथील नागरीक, ज्येष्ठ नागरीक, या वॉर्डाच्या स.सदस्यांना तसेच मंदीर, मस्जीद, चर्च

मधील जे ट्रस्टी, धार्मीक धर्मगुरू असतील त्यांचेकडून पुर्ण माहिती घेऊन सर्वे करण्यास आणि १९६० च्या पुर्वीच्या धार्मिक स्थळांची यादी राज्य स्तरीय समितीकडे पाठवावी. ती यादी अंतिम होऊन आल्यानंतर, ती यादी व इतर धार्मिक स्थळांची यादी सर्वसाधारण सभेत सादर करण्यास व मान्यता घेतल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २५७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या भिंतीला लागुन एक तुटलेली सार्वजनिक मुतारी आहे सदरील मुतारीचे घाण पाणी रस्त्यावर नेहमी वाहत असते सदरील मुतारीचे पाईप हे रस्ता विकसीत करतांना तुटलेले असल्याने त्यातील घाण पाणी शेजारील कब्रस्तानात जात आहे तसेच मध्यंतरी मुतारीतील घाण पाणी मनपाच्या गेट शेजारी तुंबलेले होते त्या बाबतची बातमी अनेक वर्तमान पत्रात आलेली होती. याच मुतारीच्या समोर १० फुटावर मस्जीद व दर्गा असून या मध्ये येणारे भाविकांना मुतारीचे घाण पाण्याचा फार त्रास होत आहे.

सध्या टाऊन हॉल येथील मलीक अंबर उड्डाण पुला खाली सार्वजनिक मुतारी नसल्याने अनेक लोक पुलाच्या खाली लघवी करीत असल्याने सर्वत्र दुर्गंध निर्माण होत आहे. मनपा शेजारील मुतारी तोडुन त्या ऐवजी टाऊन हॉल उड्डाण पुला खाली मुतारी बांधण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:** श्री.गंगाधर नामदेव ढगे **अनुमोदक:** श्री.खान फेरोज मोईनोद्दीन

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या भिंतीला लागुन एक तुटलेली सार्वजनिक मुतारी असुन मुतारीचे घाण पाणी रस्त्यावर नेहमी वाहते व मुतारीच्या समोर १० फुटावर मस्जीद व दर्गा असून या मध्ये येणारे भाविकांना मुतारीचे घाण पाण्याचा फार त्रास होत असल्याने सदर मुतारी तोडुन त्या ऐवजी टाऊन हॉल उड्डाण पुला खाली मुतारी बांधण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २५८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.१०१ एकनाथनगर येथे मनपाचे सामाजिक सभागृह आहे या सभागृहास छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देण्याची मागणी या भागातील नागरीकांनी केली असुन नागरीकांच्या भावनेचा आदर ठेऊन सदरील मनपा सभागृहास “छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक सभागृह” असे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**सुचक:** श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदक:** श्रीमती ज्योती जयेश अभंग, श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.१०१ एकनाथनगर येथील मनपाच्या सामाजिक सभागृहास “छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक सभागृह” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २५९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.१०१ फुलेनगर येथे मनपाचे सामाजिक सभागृह आहे या सभागृहास भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याची मागणी या भागातील नागरीकांनी केली असुन नागरीकांच्या भावनेचा आदर ठेऊन सदरील मनपा सभागृहास “ भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृह” असे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**सुचक:** श्रीमती लता मगन निकाळजे

**अनुमोदक:** श्रीमती ज्योती जयेश अभंग, श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.१०१ फुलेनगर येथील मनपाच्या सामाजिक सभागृहास “भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृह” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २६०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, १८ ऑगस्ट २००९ रोजी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ग्राहकांना आकारण्याच्या पाणीपट्टीत दर तीन वर्षाने २५% वाढ करावी असा ठराव केला. सन २०१२ पर्यंत सामान्य नागरीकांच्या अर्धा इंच नळास प्रतीवर्षी १८०० रु. दराने पाणी पट्टी आकारली जात होती. सन-२०१२ ते सन-२०१४ या तीन वर्षात ही पाणी पट्टी ३०५०रुपये केली गेली ही मुळ पाणी पट्टी पेक्षा ६९.४% टक्के एवढी प्रचंड वाढ आहे. आता प्रती वर्षी १०% टक्के वाढ दराने सन-२०१५ मध्ये रुपये ३३५० एवढी पाणीपट्टी आकारण्यात येते ही गोष्ट बेकायदेशीर आहे. ठरावानुसार सन-२०१२ ते सन-२०१४ या तीन वर्षात १८०० रुपये पाणी पट्टीत २५% टक्के दराने वाढ करावयाची झाल्यास सन-२०१४ ची पाणीपट्टी (१८००+४५०) २२५० एवढी होते. एवढीच पाणी पट्टी लोकांनी भरावी सन-२०१४ नंतर पाणी पट्टीत पुन्हा २५% टक्के वाढ सन-२०१७ मध्ये करता येईल यापुर्वी केलेली कोणतेही वाढ सर्वसाधारण सभेच्या ठरावाविरुध्दची असल्याने ती बेकायदेशीर असेल.

**सुचक:** श्री.रावसाहेब राधाकिसन आमले **अनुमोदक:** श्री.सुभाष सयाजी शेजवळ

**संवाद:-**

श्री.राजगौरव वानखेडे :समांतर एजन्सीला नोटीस दिली त्यात काय दिले.

कार्य.अभियंता(पापू) :नोटीसचा तपशिल वेबसाईटवर टाकलेला आहे. मुख्य जलवाहिनीचे काम टाक्या बांधणे थांबवले, चर्चा झाली. ज्या चुका कंपनी करीत आहे जी अपेक्षा महापालिकेस आहे त्याप्रमाणे काम होत नाही. कामे होत नाही म्हणून नोटीस दिले ते नमूद केले.

श्री.नंदकुमार घोडेले :यापुर्वीच्या नोटीसमध्ये व या नोटीसमध्ये काय फरक आहे? जायकवाडी ते शहरापर्यत लाईन टाकण्याचे सुरू केले होते आता बंद आहे का?

मा.उपमहापौर :कंपनीने व महापालिकेने किती पैसे खर्च केला? नोटीसीत दिले का? ते सांगावे.

कार्य.अभियंता :नोटीसचे उत्तर येईल. सर्व ओपनली नोटीस मध्ये नमूद केले आहे.

श्रीमती सरवत बेगम :प्रत्येक वर्षी १० टक्के पाणीपट्टीत वाढ तर २०४० पर्यत ३६ हजार पाणीपट्टी होणार आहेत का?

कार्य.अभियता :हे रेट सभागृहानेच मान्य केले.

| | |
|---|---|
| श्रीमती सरवत बेगम | :करारनामा केला तो रद्द करावा कंपनी ठरल्यानुसार पाणी देत नाही. |
| श्री.राजगौरव वानखेडे | :मुबलक पाणी देणार असेल तरच १० टक्केची वाढ करावी. |
| श्री.सय्यद मतीन | :नोटीस दिली तर काम बंद केले अर्धवट कामे पुर्ण करावे. |
| मा.महापौर | :मा.आयुक्तांनी कंपनीसोबत बैठक घेतली. चौकशी चालू आहे. आयुक्तांनी लक्ष घातले आहे जी कामे बंद केली ती पुर्ण करावी. |
| श्री.अजीम अहेमद | :रोषणगेट भागात पाण्याची टंचाई आहे. संबधीत अधिकारी यांना माहिती दिली. कार्यवाही केली नाही. पाण्याच्या टाकीचे काम होत नाही. |
| श्रीमती मनीषा मुंढे | :माझ्या वार्डात घाण पाणी येते, कुणीही दखल घेत नाही. |
| श्रीमती समीना शेख | :टॅंकरद्वारे पाणी दिले पर टॅंकरचा रेट काय? |
| कार्य.अभियंता (पापू) | :३०५ पर ड्रम रेट आहे. एक टॅंकरसाठी दर निश्चित केले आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :गीरजादेवी हौ.सोसायटी जवळील जेथे टॅंकर भरले जाते तेथे संरक्षित भिंतीचे काम करणार होते केले नाही. |
| कार्य.अभियंता (पापू) | :समांतर एजन्सी काम करेल. ओपनस्पेस दिली नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :नुसती टाकी दिली नाही. ओपनस्पेस दिली चुकीची माहिती अधिकारी देत आहे. १०० टॅंकर भरले जातात. जिवीतहानी झाली तर महापालिका जबाबदार असेल. मा.आयुक्तांनी व्हिजीट करावी. ताबडतोब निर्णय घ्यावा. |
| कार्य.अभियंता (पापू) | :आताचे टॅंकरचे रेट ३६५० आहे. |
| श्रीमती समीना शेख | :माहिती प्रमाणे पर टॅंकर र.रू.७५०/- आहे. जालना नगर पालिका मोफत टॅंकर देते. येथे एवढे रेट का? |
| कार्य.अभियंता(पापू) | :वैयक्तिक कामासाठी १० हजार लि.टॅंकरसाठी र.रु.१०००/- व ५ हजारसाठी र.रु.६००/- असे रेट ठरवून दिलेले होते. २०१४ चे रेट आहे. १० टक्के रेट धरून ते रेट असतील ते बरोबर आहे. |
| श्री.सय्यद मतीन | :पाण्याच्या टाकीचे कामाचा सर्वे केंव्हा करणार आहे. एक दिवसा आड पाणी पुरवठा कंपनी करीत नाही किती दंड आतापर्यत आकारला. |
| कार्य.अभियंता(पापू) | :सर्वे चालू झाल्यास आपणांस कळविण्यात यावे. लाईटची अडचण असते तेव्हा पाणी येत नाही. स.सदस्य यांनी दिलेले पत्र कंपनीकडे सादर केले. |
| मा.उपमहापौर | :मनपा किती खर्च करते? व कंपनी किती करते? यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणाची नियुक्ती केली? |
| कार्य.अभियंता(पापू) | :ऑडीटर रिपोर्ट घेतात ते खुलासा करतील. |
| मुख्यलेखाधिकारी | :जे चिफ ऑडीटर लावले ऑडीट करण्यासाठी ते फक्त पैसे कलेक्शन अकाऊंटमध्ये जमा होतात. त्यास जबाबदार आहे जो खर्च होतो त्याची माहिती माझेकडे नाही. |
| कार्य.अभियंता(पापू) | :कंपनीच्या मार्फत १०२.१२,९०४८३/- इतका खर्च केला |
| मा.उपमहापौर | :याचा हिशोब कोण ठेवतो. |
| कार्य.अभियंता(पापू) | :ऑडीटर म्हणून नागपूरची कंपनी आहे. महापालिकेने दिलेले पैसे व त्यांनी केलेला खर्चाचा हा रिपोर्ट आहे. |

श्री.विकास एडके :१०२ कोटी खर्च केले? कशावर केले? त्याचे विवरण सर्व सदस्यांना देण्यात यावे.

श्रीमती मुल्ला सलीमा बेगम:माझ्या वार्डातील पाण्याचा प्रश्न सोडवावा. सहा महिन्यापासून लाईन खराब आहे. ३०० लाईन आहे कचरा अडकलेला आहे पाणी येत नाही.

कार्य.अभियंता-पापू :ताबडतोब कार्यवाही करण्यात येईल.

श्री.राजगौरव वानखेडे :एन-११ येथील अर्धवट टाकीचे काम पुर्ण करण्यात यावे.

मा.महापौर :विषय मंजूर नियमानुसार कार्यवाही करावी.

सौ.रोजतकर पुष्पा :एन-११ नवजीवन कॉलनी भागातील टाकीचे अर्धवट काम आहे.

कार्य.अभियंता(पापू) :सर्वे केला प्रोसेसमध्ये आहे. कंपनी काम करीत नाही म्हणूनच नोटीस दिली आहे. १५ दिवसाची मुदत आहे कार्यवाही केली जाईल. ७५ कोटी दिले.

मा.महापौर :कंपनी काम करीत नाही असे बोलून चालणार नाही कंपनीने पैसे घेतलेले आहे काम करून घ्यावे.

श्रीमती माधुरी देशमुख :कंपनीपुढे प्रशासन एवढे हतबल का झाले? पैसे दिले आहे काम का करीत नाही?

मा.उपमहापौर :कंपनीला किती रक्कम आजपर्यत दिली.

कार्य.अभियंता(पापू) :७५ कोटी दिले.

मुख्यलेखाधिकारी :१२२ कोटी दिलेले आहे. दोन प्रकारचे अकाऊंट आहे.एओएसजी म्हणून जे महापालिका पैसे देतात शेवटचा हप्ता १५-९-२०१५ दिला असे आतापर्यत ७५.७५ कोटी दिले. कलेक्शन अकाऊंटमध्ये पाणीपट्टी जमा होते. त्याचा हिशोब ऑडीटरकडून घेतो. प्रतिनियुक्तीवरील कर्मचारी यांचा वेतनाचा खर्च १०.७७ कोटी, पाणीपुरवठा वितरण देयकासाठी १४.९२ कोटी, पाटबंधारे दयावयाची पाणी खरेदीचा मोबदला शासकीय अनुदानातून माईस्टोनप्रमाणे ग्रण्डमधून २०.०८ कोटी देण्यात आले.

श्री.राजगौरव वानखेडे :मनपाने दिले १२२ कोटी कंपनीने १०२ कोटी असे २२४ कोटी खर्च झाले का?

मा.महापौर :या संदर्भात मा.आयुक्तांनी सुध्दा चौकशीचे आदेशीत केले आहे. किती पैसे दिले सर्व सदस्यांना माहिती दयावी स.सदस्य श्री.सय्यद मतीन यांचे वार्डातील टाकीचे काम हाती घ्यावे या विषया बाबत नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन-२०१२ पासून आजपर्यंत केलेली पाणीपट्टी वाढ ही योग्य की अयोग्य या बाबतीत सर्व तपासणी करून नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २६१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेत मागील १८ ते २२ वर्षापासुन आस्थापनेवर दोन दिवसाचा तांत्रीक खंड देऊन सहा-सहा महिन्याच्या मुदतवाढीवर काम करणाऱ्या परंतु मनपा सेवेत अद्यापही कायम न झालेल्या दैनिक वेतन कर्मचाऱ्यांना सेवेत

कायम स्वरुपी करणे बाबत शासन स्तरावर पाठपुरावा करणेसाठी मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करावी. त्या समिती मध्ये मा.उपमहापौर, मा.सभापती, स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता, मा.स्थायी समिती सदस्य प्रशासनाच्या वतीने संबंधीत यांची नियुक्ती करावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:** श्री.रावसाहेब राधाकिसन आमले **अनुमोदक:** श्री.सुभाष सयाजी शेजवळ

श्रीमती समीना शेख :मनपाच्या आस्थापनेवर एकूण २०५ कर्मचारी दै.वेतनावर असुन १५-२० वर्षापासून कार्यरत आहे त्यांना विनाअट सेवेत समावेश करावे.त्यांनी वयोमर्यादा ओलांडली ७-८ हजार पगार मिळतो व मुदतवाढ उशीरा दिली जाते. पगार वेळेवर होत नाही त्यामूळे उपासमार होते. सार्वजनिक सुट्टयाचा पगार नाही. भत्ते मिळत नाही. तसेच पीएफ व जीपीएफ कपात होत नाही. हे कर्मचारी इमाने इतबारे काम करतात. या प्रस्तावानुसार समितीमध्ये अति.आयुक्त व आस्थापना अधिकारी यांचा समावेश करावा.

मा.महापौर :नियमानुसार कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दैनिक वेतन कर्मचाऱ्यांना सेवेत कायम स्वरुपी करणे बाबत शासन स्तरावर पाठपुरावा करणेसाठी मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करून त्या समिती मध्ये मा.उपमहापौर, मा.सभापती, स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता, मा.स्थायी समिती सदस्य प्रशासनाच्या वतीने संबंधीत यांची नियुक्ती करण्याकरीता नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक २६२:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६६ अजबनगर-कैलासनगर वार्डातील मिलींदनगर, गौतमनगर येथे रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणेसाठी दलित वस्ती सुधार योजनेतुन निधी प्राप्त करणेसाठी रुपये (५० लक्ष) करीता प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:** श्रीमती आशा नरेश भालेराव **अनुमोदक:** श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.६६ अजबनगर-कैलासनगर वार्डातील मिलींदनगर, गौतमनगर येथील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणेसाठी दलित वस्ती सुधार योजनेतुन रक्कम रुपये ५० लक्षचा निधी उपलब्ध करून देण्याकरीता प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक २६३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभा (कार्यक्रम पत्रिका क्रमांक-८) दिनांक २०.१०.२०१५ मध्ये विषय क्र.२०२ व विषय क्र.२१७ कार्यक्रम पत्रिकेवर असतांना सुध्दा मा.महापौर यांच्या सुचनेनुसार सदरील दोन्ही विषय पुढच्या सर्वसाधारण सभेत मांडण्यात येईल असे सुचविल्यामुळे यावर निर्णय घेण्यात आलेला नाही. सदर सभे नंतर दोन सर्वसाधारण सभा झाल्या असुन उपरोक्त क्रमांकाचे विषय दिनांक १४.१२.२०१५ रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेमध्ये घेऊन सर्वानुमते प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचक:** श्री.विजय साईनाथ औताडे **अनुमोदक:** श्री.राजेंद्र हिम्मतराव जंजाळ

| | |
|---|---|
| श्री.नंदकुमार घोडेले | :आधीचे विषय काय होते? तेही दयायला पाहिजे. |
| मा.उपमहापौर | :पुढील सभेत घेण्यात यावे. |
| मा.महापौर | : २६४ मंजूर तसेच स्मार्ट सिटीचा एसपीव्ही चा विषय आहे. तोही मंजूर. या विषया संदर्भात विधी सल्लागार यांनी खुलासा करावा. |
| विधी सल्लागार | :या विषयी डॉ जयश्री कुलकणी यांनी रिट यांचिका १००७८/२०१५ दाखल केली आहे. त्यात महापालिका राज्यशासन, सचिव नगर विकास व डॉ.सुहास जगताप यांना पार्टी केले आहे. याचिकेत विनंती केली की आरोग्य वैद्य.अधिकारी पदावर नियुक्ती केली ती नियमीत ठेवावी. दि.२४-६-१५ च्या आदेशान्वये केली. तो आदेश कायम करावा व या पदावर काम करण्याचे आदेश व्हावे. यात सर्वांचे म्हणणे मांडले ३५ डॉक्टर यांनी कन्टेम विशेष वकिला मार्फत विनंती केली की, आमचे ही म्हणणे या याचिकेत ऐकूण घ्यावे. सर्वाचे म्हणणे ऐकूण ५-१०-२०१५ ला जैसे थे चे आदेश दिले होते. यांचिका निर्णयासाठी न्यायप्रविष्ट आहे. मा.न्यायालयात या पदाच्या संदर्भात प्रकरण आहे. जे दोन विषय आहे ते या पदाच्या संदर्भात आहे त्यावर निर्णय घेणे योग्य नाही.परंतु पिठासीन अधिकारी महापालिका श्रेष्ठ आहे निर्णय घेण्यास सक्षम आहे |
| श्री.फिरोज खान | :ठराव मंजूर करू शकतो सभागृहाचा अधिकार आहे. |
| श्री.विजय औताडे | :डॉ.जयश्री कुलकर्णी यांनी रिट पिटीशनात शासनाकडून आलेले अधिकारी यांना चॅलेंज केलेले आहे. संबधीत अधिकारी डॉ.जगताप यांना शासनाने पाठविले आहे. डॉ.जयश्री कुलकर्णी यांना या पदावर नेमायचे की नाही सभागृहाचा निर्णय आहे. शासनाकडे एक ठराव पाठविला होता. डेस्क ऑफिसरने एक पत्र दिले. त्यानुसार मा.आयुक्त यांनी डॉ.जयश्री कुलकर्णी यांना पदोन्नती दिली. सभागृहा समोर येत नाही. तोपर्यत अशी नियुक्ती देता येत नाही. |
| श्री.दिलीप थोरात | :पदोन्नतीने जी नियुक्ती दिली त्यास सभागृहाची मान्यता नाही. सभागृहाची मान्यता मिळाल्यानंतरच त्यांना पदोन्नती देणे योग्य वाटते. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :पदोन्नती दिली. सभागृहाची मंजूरी घेणे आवश्यक होते का? विधी सल्लागार यांचा खुलासा घ्यावा. |
| श्री.शेख अब्दुल ताहेर | :मा.न्यायालयाने जैसे थे चे आदेश दिले होते ती परीस्थिती होती त्यात कोणताही बदल करता येणार नाही. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :पॅनल वरील विधीज्ञ श्री.कराड यांचेकडे हे प्रकरण पाठवून अभिप्राय घ्यावा. |
| श्री.विजय औताडे | :डॉ.जयश्री कुलकर्णी यांना या पदावर राहू दयायचे की नाही महापालिकेचा निर्णय आवश्यक आहे व डॉ.जगताप हे त्या पदावर राहतील की नाही हे मा.न्यायालय ठरविल असा विषय आहे. कलम ४५ नुसार पदोन्नतीसाठी प्रस्ताव सभेपुढे यायला पाहिजे. |
| विधी सल्लागार | :प्रकरणात सर्वच बाबी नमुद आहे. कुठलीही अडचण निर्माण होऊ नये. आदेशानुसार जैसे थे परीस्थिती ठेवावी. |
| श्री.विजय औताडे | :पदोन्नती देण्यास सभागृहाची मान्यता आहे का ? |

विधी सल्लागार :आस्थापना विभागाकडून सुरवातीला प्रस्ताव ठेवलेला होता. शैक्षणिक पात्रता वगैरे तपासणीसाठी पाठवावे व मंजूरी दिली नव्हती. हे पद संविधानिक असल्याने मान्यतेची गरज आहे. पुन्हा प्रस्ताव ठेवला मान्यता दिली नाही. प्रशासनातर्फे तो प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता.

श्री.दिलीप थोरात :शासनाकडून मान्यता आल्यानंतर पदोन्नती देणेसाठी सभागृहाची मान्यतेची गरज होती की नाही?

श्रीमती माधुरी देशमुख :महापालिकेने पदोन्नतीस मान्यता दिली नाही हा मुद्दा मा.न्यायालयात मांडलेला आहे.

आस्थापना अधिकारी-१ :पदोन्नतीची नियुक्ती दिली महासभेची मान्यता नाही.

विधी सल्लागार :सर्व बाबी ॲफिडेव्हिट मध्ये नमूद केल्या आहे. प्रस्ताव फेटाळलेला आहे शासनाकडे पाठविले होते.

श्री.राजगौरव वानखेडे :शासनाकडे पाठविले सभागृहाची मान्यता घेणे आवश्यक होते. हा सभागृहाचा अवमान आहे.

श्री.दिलीप थोरात :या सभेत प्रस्ताव फेटाळला तरी शासनाकडे पाठविला. शासनाने मान्यता दिली त्यानंतर पदोन्नती देतांना या सभेची मान्यतेची गरज होती की नाही?

विधी सल्लागार :सर्वसाधारण सभेचा ठराव शासनाने विखंडीत केला व प्रमोशन देण्याचे आदेश निर्गमित केले. त्यानुसार त्यांना नियुक्ती दिली. शासनाचे ४५१(४) कलम नुसार अंमलात आणावा बंधनकारक आहे. त्यानुसार कार्यवाही झाली. सर्वसाधारण सभेला अवगत करणे आवश्यक होते व तसे आस्थापना विभागाकडून नगर सचिव विभागाकडे पाठविल्याचे समजते.

श्री.नंदकुमार घोडेले :शासनाने जे निर्देश दिले होते. ते मा.महापौर व स.पदाधिकारी यांना कळविले होते का? आस्थापना विभागाने ही कार्यवाही केली का?

आस्थापना अधिकारी-१ :अशी कार्यवाही केली नाही, परंतु शासनाच्या निर्देशानुसार डॉ.जयश्री कुलकर्णी यांना पदोन्नती दिली. या बाबत नगर सचिव यांचेकडे प्रत देऊन सर्वसाधारण सभेला अवगत करावे असे कळविले होते.

श्री.नंदकुमार घोडेले :ही प्रशासनाची जबाबदारी होती. प्रत्यक्ष मा.महापौरांकडे प्रत द्यायला पाहिजे होती. प्रशासनाने यात जी प्रक्रिया करायला पाहिजे ती केली नाही.

आस्थापना अधिकारी-१ :तशी कार्यवाही केली नाही. ती संचिका विधी सल्लागार यांचेकडे पाठवून जे लिगल ओपनीयन घ्यायचे ते घेतले जाईल.

श्री.नंदकुमार घोडेले :या प्रकरणात अनियमितता झाली. जे दोषी आहे चौकशी करावी कार्यवाही करावी. या प्रकरणाचा संक्षिप्त अहवाल अति.आयुक्त यांचेकडून घ्यावा.

मा.महापौर :या संबधी मा.न्यायालयात प्रकरण आहे. न्याय पालिकेचा आदर राखून कार्यवाही होणे आवश्यक आहे. मा.न्यायालयाचा अवमान होणार नाही जे पॅनलवर वकील आहे त्यांचे मार्गदर्शन घेवून पुढील सभेत हा विषय घेता येईल अति.आयुक्त यांनी माहिती घेऊन अहवाल सादर करतील.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विषय क्र.२०२ व विषय क्र.२१७ या संबधी मा.न्यायालयात प्रकरण आहे. न्याय पालिकेचा आदर राखून कार्यवाही होणे आवश्यक असल्याने जे पॅनलवर वकील आहे त्यांचे मार्गदर्शन घेवून अति.आयुक्त यांनी माहितीचा अहवाल देऊन पुढील सभेत सदर विषय घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २६४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ च्या मुळ अर्थसंकल्पा मधील स्पील ओव्हरच्या कामांच्या यादी मध्ये जुने वार्ड क्र.९७ (आताचे वार्ड क्र.१०५) मधील खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| पान क्र. | अ.क. | जुने कामाचे नांव | नवीन कामासाठी लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| Ward-f-spill p.no-८५ | २६ | वार्ड क्र.९७ विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. आर्थिक तरतुद १० लक्ष. | वार्ड क्र.१०५ मध्ये सादातनगर मधील गल्ली क्र.१५ मध्ये कॉंक्रेटींग करणे. |
| Ward-f-spill p.no-८५ | २७ | वार्ड क्र.९७ बनेवाडी येथील गल्ल्यांमध्ये कॉंक्रेटींग करणे आर्थिक तरतुद १० लक्ष. | वार्ड क्र.१०५ मध्ये सादातनगर मधील गल्ली क्र.१६ मध्ये कॉंक्रेटींग करणे. |

सुचक: श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद अनुमोदक: श्री.गंगाधर नामदेव ढगे.
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०१५-२०१६ च्या मुळ अर्थसंकल्पामधील स्पील ओव्हरच्या कामांच्या यादी मध्ये जुने वार्ड क्र.९७ (आताचे वार्ड क्र.१०५) मधील खालील प्रमाणे कामांचे नियमानुसार लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र. | अ.क. | जुने कामाचे नांव | नवीन कामासाठी लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| Ward-f-spill p.no-८५ | २६ | वार्ड क्र.९७ विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. आर्थिक तरतुद १० लक्ष. | वार्ड क्र.१०५ मध्ये सादातनगर मधील गल्ली क्र.१५ मध्ये कॉंक्रेटींग करणे. |
| Ward-f-spill p.no-८५ | २७ | वार्ड क्र.९७ बनेवाडी येथील गल्ल्यांमध्ये कॉंक्रेटींग करणे आर्थिक तरतुद १० लक्ष. | वार्ड क्र.१०५ मध्ये सादातनगर मधील गल्ली क्र.१६ मध्ये कॉंक्रेटींग करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २६५:-**

मा.आयुक्त यांची मान्यता दिनांक १०.१२.२०१५ नुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग (मंत्रालय, मुंबई) चा शासन निर्णय क्र.स्वमअ-

२०१५/प्र.क्र./२४९/नवि-३४ दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ भारत अभियान (नागरी) ची अंमलबजावणी राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये मिशन मोड पध्दतीने सुरू झाली आहे. या अभियानाच्या देशपातळीवरील अंमलबजावणीचा आढावा केंद्रीय स्तरावरून मा.पंतप्रधान महोदय व केंद्रीय मंत्रिमंडळ सचिव हे स्वत: घेत आहेत. तसेच राज्यस्तरावरील या अभियानाच्या अंमलबजावणीचा आढावा मा.मुख्यमंत्री, मा.मुख्य सचिव व सचिव (नवि-२) नगर विकास विभाग हे वेळोवेळी घेत आहेत. त्यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमधील या अभियंनाच्या अंमलबजावणीचा आढावा राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्वसाधारण सभेमध्ये घेणे आवश्यक असल्याने शासन सर्व संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना पुढील प्रमाणे सुचना देत आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाब संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्वसाधारण सभेच्या विषयसुचीवर कायमस्वरूपी समावेश करून या विषयाचा सविस्तर आढावा सर्वसाधारण सभेमध्ये घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग (मंत्रालय, मुंबई) चा शासन निर्णय क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र./२४९/नवि-३४ दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ भारत अभियान (नागरी) ची अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाब संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्वसाधारण सभेच्या विषयसुचीवर कायमस्वरूपी समावेश करून या विषयाचा सविस्तर आढावा घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक २६६:-</u>**

प्रस्तुत प्रकरणात मा. आयुक्त महोदय यांनी आदेशीत केल्यानुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की महाराष्ट शासनाचे परीपत्रक क्र. स्वमअ/प्र.क्र.२४९/नवि-३४ दिनांक १९/१०/२०१५ नुसार केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान धर्तीवर संदर्भीय शासन निर्णयान्वये “स्वच्छ महाराष्ट अभियान” घनकचरा व्यवस्थापन चा अंर्तभाव असून सदरील परिपत्रकानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमधील स्वच्छ महाराष्ट अभियान च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाब संबंधीत नागरी संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्वसाधारण सभेमध्ये घेण्यात यावा असे निर्देश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिका यांनी खालील प्रमाणे कार्यवाही केलेली आहे व खालील प्रमाणे कार्यवाही सुरु देखील आहे.

१) दि. १२/११/२०१५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे स्वचछता केली.
२) दि. १० ते १५ नोव्हें.२०१४ या कालावधीत मनपाच्या सर्व शाळा, आरोग्य केंद्र, मुख्यालय येथे स्वच्छता करण्यात आली.
३) दि. १७.११.२०१५ रोजी राज्यस्तरीय जिल्हा क्रिडा क्षेत्रातील खेळाडू तसेच जिल्हा क्रिडा कार्यालय येथील अधिकारी, कर्मचारी यांचे समवेत साफसफाई मोहिम राबविण्यात आले.

**स्वच्छ भारत अभियानाबाबत सुरु करण्यात आलेली कार्यवाही**

१) दिनांक २५/११/२०१५ रोजी स्वच्छतेबाबत मा. आयुक्त महोदय, मा.महापौर, मा. उपमहापौर, मा. स्थायी समिती सभापती दिलीप थोरात, घनकचरा कक्ष प्रमुख शिवाजी झनझन, कार्यकारी अभियंता सिकंदर अली व सिव्हीक रिस्पॉन्स टिम च्या नताशा जरीन, गौरी मिराशी यांचे बरोबर बैढक घेण्यात आली.

२) दिनांक ३०/११/२०१५ रोजी मा. उपमहापौर यांचे दालनात मा. आयुक्त महोदय, उपमहापौर प्रमोद राठोड तसेच सिव्हिक रिस्पॉन्स टिमच्या नताशा जरीन व गौरी मिराशी यांची बैठक होवून संपूर्ण शहर कचरा मुक्त करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

३) दिनांक ०३/१२/२०१५ बायोमेडीकल वेस्ट संदर्भात इंडियन मेडीकल असो. सदस्य तसेच मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त महोदय, आरोग्य वैदयकिय अधिकारी डॉ. जगताप, वैदयकिय अधिकारी डॉ. निता पाडळकर, घनकचरा कक्ष प्रमुख श्री. शिवाजी झनझन तसेच सिव्हीक रिस्पॉन्स टिमच्या नताशा जरीन व गौरी मिराशी यांची चर्चा होवून बायोमेडीकल वेस्ट एजन्सीबाबत तक्रारी असल्याकारणाने नवीन एजन्सी निर्माण करणेबाबत चर्चा करण्यात आली.

४) दिनांक ०३/१२/२०१५ रोजी मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त महोदय, घनकचरा कक्ष प्रमुख श्री. शिवाजी झनझन तसेच सिव्हीक रिस्पॉन्स टिमच्या नताशा जरीन व गौरी मिराशी यांची कचरा वेचक संघटना तसेच कचरा वेचक महिला व पुरुष यांच्याशी चर्चा करुन सुका कचरा संबंधीत कचरा वेचकांनी घराघरातून गोळा करुन त्याची विल्हेवाट लावावी व ओला कचरा महानगरपालिका यांनी गोळा करुन त्यांचे वॉर्ड अंर्तगत विल्हेवाट लावावी याबाबत चर्चा करुन कामाची सुरुवात करण्यात आली.

५) दिनांक ०५/१२/२०१५ मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त महोदय, घनकचरा कक्ष प्रमुख श्री. शिवाजी झनझन तसेच सिव्हीक रिस्पॉन्स टिम व बरोबर वॉर्ड अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व जवान तसेच घनकचरा कक्ष प्रमुख यांची एकत्रीत चर्चा होवून औरंगाबाद शहर कचरामुक्त म्हणजेच " शून्य कचरा मोहीम" राबवून शहर कचरामुक्त करण्याबाबत काय करता येईल याबाबत नियोजन करण्याबाबत चर्चा करुन काम करण्यात सुरुवात कशाप्रकारे करण्यात येईल याबाबत चर्चा करण्यात आली.

६) दिनांक ०८/१२/२०१५ रोजी मा.आयुक्त महोदय, घनकचरा कक्ष प्रमुख यांनी ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टीक पिशव्या विकणा-या व्यावसायीकांची बैठक आयोजीत करुन संबंधीत व्यावसायीकांना ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिक पिशव्या न विकण्याबाबत सांगितले तसेच व्यावसायिकांना ३१ डिसेंबर पर्यंत मुदत देवून त्यानंतर सदरील पिशव्या बाजारात विकू नये तसेच याबाबत नागरीकांमध्ये ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टीक पिशव्या न वापराबाबत जनजागती करणेबाबत ठरविण्यात आले.

७) ०९/१२/२०१५ रोजी सिव्हीक रिस्पॉन्स टिम यांनी सर्व वॉर्ड अधिकारी यांचे बरोबर चर्चा करुन शहरात " शून्य कचरा मोहिम" राबविण्यात बाबत सहा वॉर्ड अंर्तगत सर्व्हेक्षण करुन नियोजन केले याबाबत मोहिमे अंर्तगत योग्य ती कार्यवाही सुरु करण्यात आली.

८) १०/१२/२०१५ रोजी " शून्य कचरा मोहिम" अंर्तगत सहा वॉर्ड अंर्तगत काम करणारे जवान यांचे बरोबर सिव्हीक रिस्पॉन्स टिम यांनी संबंधीत जवान यांना या मोहिमेत कशाप्रकारे काम करावयाचे आहे याबाबत माहिती दिली.

९) ११/१२/२०१५ रोजी घनकचरा कक्ष प्रमुख तसेच वॉर्ड अधिकारी अ,ब व क यामध्ये येणारे जवान यांना शून्य कचरा मोहिम कशाप्रकारे राबविण्यात येत आहे व याबाबत औरंगाबाद शहरात कशाप्रकारे नियोजन करता येईल व शहर कचरामुक्त करता

येईल यासाठी वाळुंज एमआयडीसी येथे राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पाची पाहणी दौरा आयोजीत करण्यात आला.

१०) १२/१२/२०१५ रोजी घनकचरा कक्ष प्रमुख तसेच वॉर्ड अधिकारी ड,ई व फ यामध्ये येणारे जवान यांना शून्य कचरा मोहिम कशाप्रकारे राबविण्यात येत आहे व याबाबत औरंगाबाद शहरात कशाप्रकारे नियोजन करता येईल व शहर कचरामुक्त करता येईल यासाठी वाळुंज एमआयडीसी येथे राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पाची पाहणी दौरा आयोजीत करण्यात आला.

११) दिनांक १४/१२/२०१५ रोजी वॉर्ड अ अंर्तगत “शून्य कचरा मोहिम” राबविण्याबाबत वॉर्ड अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, जवान, सफाई मजूर यांचेबरोबर प्रत्यक्ष प्रभागात पहाणी व नियोजन.

१२) दिनांक १५/१२/२०१५ रोजी वॉर्ड ब अंर्तगत “शून्य कचरा मोहिम” राबविण्याबाबत वॉर्ड अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, जवान, सफाई मजूर यांचेबरोबर प्रत्यक्ष प्रभागात पहाणी व नियोजन.

१३) दिनांक १६/१२/२०१५ रोजी वॉर्ड क अंर्तगत “शून्य कचरा मोहिम” राबविण्याबाबत वॉर्ड अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, जवान, सफाई मजूर यांचेबरोबर प्रत्यक्ष प्रभागात पहाणी व नियोजन.

१४) दिनांक १७/१२/२०१५ रोजी वॉर्ड ड अंर्तगत “शून्य कचरा मोहिम” राबविण्याबाबत वॉर्ड अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, जवान, सफाई मजूर यांचेबरोबर प्रत्यक्ष प्रभागात पहाणी व नियोजन.

१५) दिनांक १८/१२/२०१५ रोजी वॉर्ड ई अंर्तगत “शून्य कचरा मोहिम” राबविण्याबाबत वॉर्ड अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, जवान, सफाई मजूर यांचेबरोबर प्रत्यक्ष प्रभागात पहाणी व नियोजन.

१६) दिनांक २१/१२/२०१५ रोजी नागरीकांमध्ये घनकचरा विषयी जनजागती व पत्रकार व इतर सामाजिक संस्था यामध्ये जनजागती करणेबाबत नियोजन.

१७) दिनांक २२/१२/२०१५ रोजी वॉर्ड अ,ब व क अंर्तगत नियोजन केलेल्या दोन निवडणूक वॉर्डचे व संपूर्ण झोनचे नियोजनाबाबत प्रात्येक्षिक दाखविणे.

१८) दिनांक २६/१२/२०१५ रोजी वॉर्ड अ,ब,क,ड,ई व फ यांनी “शून्य कचरा मोहिम” राबविण्याबाबत नियोजनानुसार व केलेल्या कामानुसार बक्षिस वितरण.

१९) औरंगाबाद महानगरपालिका यांनी “ स्वच्छ भारत अभियान” महानगरपालिका स्वच्छता स्पर्धेत भाग घेतलेला आहे.

उपरोक्त नुसार प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेमध्ये मान्यतेस्तव तथा अवलोकनार्थ सादर

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे केंद्र शासनाच्या स्चच्छ भारत अभियान धर्तीवर “स्वच्छ महाराष्ट अभियान” घनकचरा व्यवस्थापन चा अंर्तभाव असून सदरील परिपत्रकानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमधील स्वच्छ महाराष्ट अभियान अंतर्गत प्रस्तावात नमुद अनुक्रमांक १ ते ३ नुसार केलेली कार्यवाही तसेच अनुक्रमांक १ ते १९ नुसार स्वच्छ भारत अभियानाबाबत प्रस्तावातील सुरू करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सादर केलेला व अवलोकनार्थ आढावा यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक २६७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनामार्फत अमृत तसेच स्मार्ट सिटी या दोन योजना विविध राज्यांमधील निवड झालेल्या शहरामध्ये राबविण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

स्मार्ट सिटी या योजनेमध्ये विविध राज्यांमधून/केंद्र शासीत प्रदेशांमधून एकुण ९८ शहराची निवड करण्यात आली आहे. सदर ९८ शहरामध्ये ऐतिहासीक औरंगाबाद शहराचा देखील समावेश करण्यात आलेला असून राष्ट्रीय स्तरावर स्मार्टसिटी चॅलेंज / स्पर्धा होत असून त्यातून पहिल्या टप्प्यात एकूण २० शहराची निवड करण्यात येणार आहे. त्यास्तव औरंगाबाद शहराची पहिल्या २० शहराच्या यादीत निवड होणेकरीता स्मार्टसिटी प्रोपोजल (प्रस्ताव) तयार करण्याचे काम Knight Frank (India) Pvt.Ltd. Fortress Infrastructure Advisory Services आणि PSP Financial Consultants Pvt.Ltd. यांचेमार्फत करण्यात आले आहे.

केंद्र शासनामार्फत लोकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारण्यासाठी, स्वच्छ, शाश्वत व पर्यावरणपुरक शहरे तयार करण्यासाठी स्मार्ट सिटी अभियान या महत्वाकांक्षी अभियानाची घोषणा मा.पंतप्रधान महोदयांनी दिनांक २५.६.२०१५ रोजी केली आहे.

केंद्र शासनामार्फत प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार स्मार्ट सिटी अभियानाच्या पहिल्या टप्प्यात केंद्र शासनाकडून स्पर्धात्मक पध्दतीने १० शहरांची निवड करुन सदर शहरांची शिफारस केंद्र शासनाकडे करणे या पहिल्या टप्प्यात राज्य स्तरावरील १० शहरामध्ये औरंगाबाद शहराची निवड करण्यात आली आहे

सदर अभियानाच्या दुस-या टप्प्यात राज्य शासनामार्फत निवड करण्यात आलेल्या शहरांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार स्मार्ट सिटी प्रस्ताव तयार करुन तो केंद्र शासनामार्फत घेण्यात येणा-या आंतरराज्यीय स्मार्ट सिटी चँलेजमध्ये सादर करणे अपेक्षित आहे.

महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) स्मार्ट सिटी प्रस्ताव (SCP) तयार करताना यासंबंधीची सर्व माहिती एकत्रित करुन जनजागृतीचे (Public Awareness) चे काम केले त्यानंतर वार्डनिहाय बैठका घेवून उपस्थित स.सदस्य, नागरिक, विद्यार्थी यांना स्मार्ट सिटी प्रस्ताव (SCP) बाबत सविस्तर माहिती दिली. यासोबत स्थानिक पातळीवर विविध शैक्षणीक संस्था, महाविद्यालये, सीएमआयए,सिआयआय यासारख्या सामाजीक संस्था व औद्योगिक प्रतिष्ठान स्तरावर बैठका घेऊन माहिती दिली व खालील इलेक्ट्रॉनिक सोशल मिडीआचा

उदा. १. फेसबुक-aurangabadsmartcity,
२. टविटर- aurangabadsmart,
३. ई-मेल-smartaurangabadcity@gmail.com
४. वेबसाईट- www.mygov.in

इत्यादीचा वापर करुन तसेच महानगरपालिकेची विविध कार्यालये/इमारती इ.मोक्याचे जागी Drop Box ठेवण्यात येऊन,घरोघरी जाऊन केलेले सर्वेक्षण हयाद्वारेही नागरिकांची मते/विचार व स्थानिक नागरिकांसाठी निबंध स्पर्धा व छायाचित्र स्पर्धा आयोजित करुन हया सर्व माध्यमातून नागरिकांचे विचार जाणून घेण्यात आले व स्मार्टसिटी प्रस्ताव तयार करण्यात आला.हया स्मार्टसिटी प्रस्ताव तयार करण्याच्या प्रक्रियेत -

**१. पुनर्विकास (Redevelopment) :** या विकास प्रकारात ज्या क्षेत्राची निवड करण्यात येईल त्या क्षेत्रातील अस्तित्वातील घरे / बांधकाम पुर्णपणे पाडण्यात येऊन त्या क्षेत्राचे नव्याने नियोजन (Planning) करण्यात येते व सदर पुनर्विकास क्षेत्रात सर्व मुलभूत सुविधा उदा.पाणी पुरवठा, मलनि:सारण, रस्ते, घनकचरा व्यवस्थापन, खुल्याजागा इ. ची तरतुद करून नव्याने त्याच ठिकाणी पुनर्विकास करण्यात येईल. या विकास प्रकारासाठी किमान ५० एकर क्षेत्र असणे आवश्यक आहे. तथापी सर्वांना तळमजल्यावर जागा मिळत नाही सबब या विकास प्रकारास नागरीकांचा अत्यल्प प्रतिसाद मिळाला.

**२. रेट्रोफिटींग (Retrofitting) :** या विकास प्रकारात अस्त्विातील घरे / बांधकामात फारसा बदल न करता आवश्यक त्या मिळकतींचे नुतनीकरण करण्यात येते. यासाठी किमान क्षेत्र ५०० एकर असणे आवश्यक आहे. या विकास प्रकारासाठी एकाच ठिकाणी आवश्यक असलेले क्षेत्र उपलब्ध होत नसल्या कारणाने नागरीकांचा कमी प्रतिसाद मिळाला आहे.

**३. ग्रीनफिल्ड (Greenfield) :** या विकास प्रकारात उपलब्ध मोकळ्या जागेत मुलभुत सुविधांचा पुर्णपणे विचार होऊन त्या ठिकाणी सर्व सोईसुविधांनी परिपुर्ण नवीन शहर/वसाहत उभारण्यात येते. यासाठी किमान क्षेत्र २५० एकर एवढे आवश्यक आहे. हे क्षेत्र साधारणत: शहराच्या बाह्य बाजुस उपलब्ध आहे. अशा प्रकाराच्या विकासामुळे नियोजीत DMIC च्या दृष्टीने परवडणारी घरे नागरीकांना उपलब्ध होतील. या विकास प्रकारास नागरीकांनी आपली मते नोंदवून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

औरंगाबाद शहराकरीता स्मार्टसिटी प्रस्ताव तयार करतांना आतापर्यंतची नागरीकांची मते /नागरीकांचे मांडलेले म्हणणे विचारात घेता उक्त तीन क्षेत्रापैकी नागरीकांनी ग्रीनफिल्ड (हरीतक्षेत्र) विकासाला प्राधान्य दिलेले आहे.

**४. Pan City :** च्या विविध पर्यायापैकी खालील पैकी दोन पर्यायांची निवड करून स्मार्टसिटीचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास दिनांक ५/१२/२०१५ ला सादर केला आहे.

१. उर्जा कार्यक्षमता अद्यायावत व्यवस्थापन प्रणाली (Energy Efficiency Management System)

२. घनकचरा व्यवस्थापन (Solid Waste Management)

३. मलनि:सारण प्रकियेतील सांडपाण्याची प्रक्रिया व पुनर्वापरासाठी अद्यायावत उपाययोजना (Smart Solution for recycling & reuse of Wastewater)

४. ई-गव्हर्नन्स (E-Governance)

सदर स्मार्टसिटी प्रस्तावास मा. सर्व साधारण सभा दि.२०.११.२०१५ ठराव क्र. २४२ ने मान्यता झालेली आहे व प्रस्ताव मान्यतेनंतर महाराष्ट्र शासनास दिनांक ५/१२/२०१५ ला सादर केला आहे व या स्मार्टसिटी प्रस्तावाचे महाराष्ट्र शासनाच्या उच्च्यस्तरीय समितीसमोर दि.११.१२.२०१५ रोजी सादरीकरण करण्यात आलेले आहे. यावेळी दिलेल्या निर्देशानुसार या स्मार्टसिटी प्रस्तावाची अंमलबजावणी करण्याकरीता आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली शासनाकडून विशेष हेतू कंपनी (Special Purpose Vehicle) गठीत करण्यात येणार असुन आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली एक संचालक समिती सदर विशेष हेतू कंपनी (SPV) चे कामकाज पाहिल. करिता विशेष हेतू कंपनी (SPV) गठीत करण्याच्या प्रस्तावासह स्मार्टसिटी प्रस्तावाच्या आर्थिक नियोजन (Smart City Proposal with Financial Plan) बनविणेसाठी मान्यता व्हावी. या विशेष हेतू कंपनीची (SPV) संचालक समिती पुढील प्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| १. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद | अध्यक्ष |
| २. महापौर, महानगरपालिका औरंगाबाद | सदस्य |

३. महानगरपालिकेमधील अधिकारी वर्गाचे ०२ प्रतिनिधी (ULB चे प्रतिनिधी ) सदस्य
४. जिल्हाधिकारी, औरंगाबाद सदस्य
५. पोलिस आयुक्त, औरंगाबाद/प्रतिनिधी सदस्य
६. सचिव, भारत सरकार (केंद्रशासनाचे प्रतिनिधी ) सदस्य
७. महाराष्ट्र शासनाचे ०२ प्रतिनिधी सदस्य
८.मुख्य कार्यकारी अधिकारी सदस्य

सदर विशेष हेतु कंपनी (SPV) कलम-८ कंपनी ॲक्ट-२०१३ च्या तरतुदीप्रमाणे गठीत करण्यात येणार आहे. करिता सदरील प्रस्ताव मान्यतेसाठी मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर वरील प्रमाणे समिती गठीत करण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल.

मा.महापौर : विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्मार्ट सिटी प्रस्तावाची अंमलबजावणी करणेसाठी विशेष हेतु कंपनी (SPV) कलम-८ कंपनी ॲक्ट-२०१३ च्या तरतुदीप्रमाणे गठीत करण्यासह स्मार्टसिटी प्रस्तावाच्या आर्थिक नियोजनासाठी (Smart City Proposal with Financial Plan) तसेच प्रस्तावात नमुद केल्यानुसार संचालक समितीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

(२६८ हा क्रमांक अनावधानाने सुटलेला आहे. कोणत्याही प्रस्तावाला हा क्रमांक देण्यात आलेला नाही.)

**चर्चा :**

श्री.राजगौरव वानखेडे :टीडीआर संदर्भात प्रश्न केला होता. आठ दिवसांपासून पेपरला बातम्या येतात. नारेगांव येथील १२ मीटर टीडीआर ऐवजी २४ मीटर टीडीआर दिला हे खरे आहे काय? माहिती दयावी.

श्री.कैलास गायकवाड :नारेगांव येथे १२ मी.ऐवजी २४ मीटर टीडीआर चौधरी नावाच्या व्यक्तीने घेतला महाराष्ट्र टाईम्स पेपरला बातम्या आहे. मा.आयुक्तांनी या संदर्भात चौकशी करावी. अशी विनंती केली. आश्वासन दिले होते. काय कार्यवाही केली.

उपअभियंता(श्री.देशमुख):नारेगाव गट २६ मधील चौधरी नावाचे व्यक्तीने टीडीआर मागितला. १२ मी. व २४ मी. असे दोन रस्ते आहे. टीडीआर सादरीकरण करतांना १२ मी.ऐवजी चुकून २४ मीटर झाले. तेच पुढे कार्यान्वित झाले. जेवढी जागा त्या व्यक्तीची होती तेवढाच टीडीआर दिला.

श्री.राजगौरव वानखेडे :नोटींग व जाहीर प्रगटनमध्ये २४ मी.देतो. नामांकित पेपरला प्रगटन न देता शिवनातीर सारख्या छोटया पेपरला जाहीर प्रगटन दिले. चौधरी नावाचे व्यक्ती यांचे नावे दिनांक ३-२-१४ ला रजिस्ट्री व फेर झाला त्याच दिवशी महापालिकेचा फेर झाला. इतकी घाई कशासाठी? महापालिकेचे नाव ३-२-१४ लागते व टीडीआरची मागणी ४ थ्या महिन्यात संबंधीत करतो. ५-६ दिवसांतच टीडीआर दिला गेला. १०-४-१५ जेई ची उपअभियंता सही पाच दिवसात सहा.संचालक नगररचना याची सही झाली. रजिस्ट्री झाल्यानंतर १५ दिवसानंतर फेर करण्यास

अवधी दिला जातो. या प्रकरणात वेगळे झाले एकाच दिवशी रजिस्ट्री होते.

श्री.कैलास गायकवाड :श्री.संजय प्रतापसिंग राजूपत यांची गट नं.२६ मध्ये जागा आहे हे प्रकरण पेपरला त्यांनी वाचले व माझी जमिन यात आहे. मा.आयुक्तांना तक्रार दिली रजिस्ट्री २००८ झाली. संबधीत व्यक्तीने २०१४ मध्ये दुसऱ्याकडून रजिस्ट्री करून मनपाकडून टीडीआरही घेतला जो मुळ मालक आहे त्यांना टीडीआर मिळायला पाहिजे होता. त्यांना अंधारात ठेवून शिवनातीर सारख्या छोटया पेपरला जाहीर प्रगटन देऊन कार्यवाही होते. चौकशी करावी याप्रमाणे तीन लोकांची जागा या रस्त्यात बाधीत आहे.चौकशी करून संबधीतावर कार्यवाही करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :या रस्त्यावर श्री राजपूत याचा १२ मी.वर १२०० स्क्वे.फुट प्लॉट आहे. चौधरी नावाच्या व्यक्तीचा १००० चौ.मी प्लॉट त्यास १० हजार चौ.मीटर दिले यात ३-४ प्लॉट गेले. ते आपल्या ताब्यात नाही तेथे अतिक्रमण सुध्दा झाले. ही जागा ताब्यात आहे असे म्हटले होते. दिशाभूल केली टीडीआर देतांना जागा आपल्या ताब्यात पाहिजे. कल्याण-डोंबीवली मध्ये आरक्षीत भुखंडावर एका व्यक्तीला १०० टक्के टीडीआर दिला. त्या जागेवर झोपडपट्टी होती. महापालिकेच्या ताब्यात नव्हती. असे प्रकरण येथे होत आहे जे टीडीआर आजपर्यत दिले त्याची चौकशी होईल.

श्री.कैलास गायकवाड :श्री.तुषार चौधरीने जी रजिस्ट्री करून दिली. त्यांनी १२ मी.रस्त्यावरील टीडीआरची मागणी केली. रजिस्टी डाकुमेन्टमध्ये १२ मीटर आहे.परंतु संचिका सादर केली २४ मी.व मंजूरी होईपर्यत २४ मीटरच आहे.

श्री.नितीन चित्ते :११३४२ सी.स.नंबर साजीदखान गुलाब महेबूब खान यांना टीडीआर दिला तो नियमानुसार दिला की अनियमीतता झाली.

उपअभियंता :या प्रकरणात अति.आयुक्त यांचेकडे चौकशीसाठी होते त्यांनी मा.आयुक्त यांना अहवाल दिलेला आहे.

श्री.नितीन चित्ते :टीडीआर देतांना तोच नकाशा असतो. जो टीडीआर देतो त्याचे अगेन्स जवळपास ५० टक्केचा फरक आहे. जागेवर पीआरकार्डवर नाव नाही. त्यावर १.३० कोटीचे कर्ज नाही. टीडीआर देऊन टाकला. बॅकेने कळविले की त्यावर कर्ज आहे तरी ४१७.१० चौ.मीटर दिला. सर्व टीडीआरची चौकशी करावी जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करावी.

मा.महापौर :महापालिकेचे नुकसान होत असेल तर अशी सर्व प्रकरणे तपासावी यात अनियमीतता झाली का? १२ मी.रस्ता असतांना २४ मीटरचे दिले जाते. संचिकेवर चुकीचे होत आहे लक्षात घ्यायला पाहिजे होते. जेथे टीडीआर दिला जातो गैरसोय होऊ नये साठी देतो. बँकेचे कर्ज असतांना जागा आपल्याकडे नसतांना दिले जाते गंभीर प्रकरण आहे. टीडीआरच्या संदर्भात तक्रारी आहे. समिती नेमावी जे दोषी असेल कायदेशीर कार्यवाही करावी. सर्व माहिती स.पदाधिकारी सदस्यांना दिली जावी. दोषीवर गुन्हे दाखल करावे.

| | |
|---|---|
| श्री.नितीन चित्ते | :माझ्या वार्डात खुल्या जागा किती व क्षेत्रफळ किती पाच पत्र दिले उत्तर दिले नाही. |
| मा.महापौर | :स.सदस्यांचे पत्राचे उत्तर तातडीने दयावेत. |
| श्रीमती विमल केंद्रे | :वार्ड ९६ मध्ये महापालिकेच्या आरोग्य केंद्रात लाईट मीटर बसविण्यात यावे. मागच्या बैठकीत सुचना केली. कार्यवाही केली नाही. विजय चौक ते हिंदु राष्ट्र चौक पर्यंतचे रस्त्याचे काम झाले नाही. |
| कार्य.अभियंता(विद्युत) | :आर्थीक नियोजन करावे लागेल. आठ दिवसात कार्यवाही होईल. |
| श्रीमती मनिषा मुंढे | :१३ वी योजना वार्ड ९१ मध्ये रस्त्याचे काम अर्धवट आहे. |
| मा.महापौर | :जी मोठी कॉक्रीटचे व्हाईट टॅपींगचे रस्ते तातडीने करावे. ही सर्व रस्त्याची कामे करण्यासाठी नियोजन करावे. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :काही कामे मंजूर, वर्क ऑर्डर झाली. कामे होत नाही. ज्यांनी कामे घेतली बील मिळत नाही म्हणून नवीन कामे बंद ठेवणार असे असेल तर ठेकेदारावर कार्यवाही करावी. |
| मा.महापौर | :जे ५-६ व्हॉईट टॅपीगचे रस्त्याचे काम ठेकेदार करीत नसेल तर दुसऱ्या क्रमांकाची एजन्सी असेल त्यांचे कडून काम करून घेणे बाबत कार्यवाही करावी. |
| श्रीमती रेश्मा कुरैशी | :टाऊन सेंन्टर एन-६ सिडको भगवान शिक्षण प्रसारक मंडळ यांनी ३ मजली इमारतीचे बांधकामासाठी परवानगी घेतली. परंतु तेथे सात मजली इमारत झाली. दैनिक भास्कर मध्ये बातमी आली आहे. मी ही पत्र दिले काय कार्यवाही केली? |
| प्रशासकीय अधिकारी | :स.सदस्यांचे पत्रांची प्रत मिळाली. वृत्तपत्रात आले वाचले. सदर ठिकाणी स्वत: प्रत्यक्ष पाहणी केली. तेथे बांधकाम झाल्याचे प्रथम दर्शनी दिसून आले. या संदर्भात संचिका नगररचना विभागाकडे आहे. त्या विभागाचा अभिप्राय आल्या नंतर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| श्रीमती रेश्मा कुरैशी | :सविस्तर खुलासा करावा. |
| श्री.फेरोज खान | :स.सदस्या यांनी विचारलेल्या प्रश्नांची योग्य माहीती मिळावी नगर रचना विभागाकडे संचिका केंव्हा पाठविली. |
| प्रशासकीय अधिकारी | :स्थळ पाहणी केली नगर रचना विभागाकडे संचिका आहे. झालेले बांधकाम लिगल कि इलिगल त्याचा अभिप्राय येईल. संचिका पाठवून ५-६ दिवस झाले. मेजरमेंन्ट नुसार झाले की नाही याची पडताळणी करण्याकरीता संचिका नगर रचना विभागाकडे आहे. माहिती घेऊ शकता. नगर रचना विभागाकडून संचिका आल्यानंतर माहिती देता येईल. |
| मा.महापौर | :या प्रकरणी ८-१० दिवसात स.सदस्यांना माहिती दयावी व तसा अहवाल सादर करावा. |
| श्री.नितीन चित्ते | :मोकाट कुत्रे पकडण्या बाबत साप्ताहिक अहवाल सादर करणार होते. |
| मुख्य पशुसंवर्धन अधि. | :मागच्या व या आठवडयाचा अहवाल आहे. ७-१२-१५ रोजी मोकाट कुत्रे पकडल्याची संख्या ३४ त्यातील १७ ऑपरेशन केले. ०८ तारखेला |

३५ कुत्रे पकडले त्यात २० कुत्र्याचे ऑपरेशन केले. ९ तारखेला २७ पकडले पैकी १३ चे ऑपरेशन केले. आठ घंटे कर्मचारी काम करतात.

मा.महापौर :एनजीओ असेल तर त्यांचे मार्फत काम करावे. कुत्रे पकडावे ऑपरेशन करावे. संख्या वाढणार नाही.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:सहकार भागात डुकरांची संख्या वाढली गाडया आल्या परंतु पकडले जात नाही.

मुख्य पशुसंवर्धन अधि. :पकडले नाही. परंतु ते जे लोक आहे त्यांना नोटीस देऊन पकडण्याचे सांगितले. २-३ दिवसात कमी होईल.

श्री.अब्दुल मं.नाविद :माझ्या वार्डातील वर्क-ऑर्डर झालेली चार कामास अद्याप सुरूवात केली नाही.

श्रीमती सुमित्रा हाळनोर:मुथीयान कॉर्नर ते शिवमंदीर रस्त्याचे काम तीन वर्षात झाले नाही.

कार्य.अभियंता(ब इ फ) :आर्थीक अडचण आहे. डांबरीकरणाचे काम आहे. मोजून घ्यावे. १०-१२ लक्षचे काम आहे.

श्री.दिलीप थोरात :शहांगज चमन ते स्टेट टॉकीजपर्यत दुभाजक, लाईटचे काम पुर्ण झाले का? बील दिले का? तेथे बेकायदेशीर उद्घाटन केले असे वाटते.

कार्य.अभियंता(विदयुत) :शहागंज चमन ते निजामोद्यीन दर्गा पर्यत पथदिव्याचे काम केले. १२ पोलवर २४ लाईट फिटींग केले. सप्टेंबर १५ मध्ये वर्क ऑर्डर केली. ५-११-१५ मध्ये काम पुर्ण झाले. देयक दिले मीटर बसवायचे आहे.

मा.उपमहापौर :लाईट बंद आहे. बील कसे दिले काम पुर्ण झाले असे कसे म्हणू शकतो.

कार्य.अभियंता(अ क ड) :टेंडर प्रमाणे जे काम होते ते केले. ठेकेदाराची अनामत रक्कम महापालिकेकडे आहे. मीटर महापालिकेला लावावे लागेल.

श्री.दिलीप थोरात :उद्घाटन करतांना त्या भागातील पदाधिकारी मा.आमदार यांना सर्वांना बोलवायला पाहिजे. या प्रकरणात सर्व नियम डावलले. यापुढे काळजी घ्यावी.

मा.उपमहापौर :प्रशासनाचे काम प्रशासनाने करावे लाईट चालू नाही. संबधीत कार्य.अभियंता यांची जबाबदारी होती. काम न करता बील दिले. असे यापुढे होऊ नये.

मा.सभापती :आपण सर्वांनी मिळून विकास करायला पाहिजे. प्रोटोकॉल पाळला पाहिजे एकमेकांना विश्वासात घेवून कार्यवाही केली पाहिजे. राजकारण बाजूला ठेवून काम करावे. या ठिकाणचे लाईट चालू करावे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:ज्योतीनगर येथील जलतरण तलाव चालू करावा. तेथील आजीव सभासदांचा समावेश करावा तसेच आयकॉन इंग्लिश स्कूलच्या इमारतीवरील मोबाईल टॉवर्स काढावे.

मा.महापौर :या बाबत तातडीने कार्यवाही करावी.

श्री.नंदकुमार घोडेले :परवा मा.महापौर यांचा वाढदिवस आहे. त्यांचा सभागृहाच्या वतीने शुभेच्छा देतो.

श्री.दिलीप थोरात :यास अनुमोदन आहे.

मा.उपमहापौर :मा.महापौर यांना त्यांचे वाढदिवसा निमित्ताने सभागृहाच्या वतीने व भारतीय जनता पक्षाच्या वतीने शुभेच्छा.

श्री.नासेर सिद्यीकी :मा.महापौर यांना वाढदिवसा निमित्त सभागृहाच्या वतीने शुभेच्छा देतो.

या वेळी मा.महापौर यांना वाढदिवसाच्या निमित्ताने सभागृहा तर्फे पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात येतात.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**स्वाक्षरित/-**
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

**स्वाक्षरित/-**
महापौर
महानगरपालिका औरंगाबाद